

**तळणीचा श्रीगणेश**

श्री सखाराम महाराजांच्या घरातील नित्य पुजेचा गणपती



**श्री संत सखाराम महाराज**



उत्तर द्वारावरील नगारखाना



समाधी मंदिर



यात्रेतील महापंगत : कार्तिक वद्य अमावस्या

# श्री सखाराम महाराज संस्थान लोणी मधील प्रमुख दैनिक व वार्षिक कार्यक्रम

## ✻ दैनिक कार्यक्रम ✻

१. अखंड मुक्त अन्नदान – संस्थानच्या वतीने दर्शनार्थ येणाऱ्या भक्तांच्या दोन्ही वेळच्या जेवण्याची व निवासाची विनामुल्य व्यवस्था केली जाते.

२. 'श्री'ना प्रात: काळी एकादष्णी रुद्राभिषेक, मंगलारती व नैवेध व रात्रौ सकृत आवर्तण व आरती

३. लोमेश्वर लिंगाची नित्य पूजा व आरती

४. मंदिरात अखंड नंदादीप असतो.

५. रोज सायंकाळी हरिपाठ

६. दर सोमवार व एकादशीला रात्रौ भजन

## वार्षिक कार्यक्रम

**चैत्र मास –** चैत्र शुक्ल १ ते ९ पर्यंत रामायणपठण 'श्री' च्या पोथीचे सामुहीक पारायण **रामनवमीला श्रीराम व श्री सखाराम जन्मोत्सव** व रात्रौ वसंतपूजा व पालखी

**वैशाख मास –** वैशाख वद्य १ ते ७ पर्यंत सुवर्ण कलश स्थापने प्रित्यर्थ संस्थानाधिपतीचे अनुष्ठान व अनुष्ठानांतर्गत गायत्रीजप, गीतापाठ, 'श्री' च्या पोथीचे पारायण, सप्तमीला समाप्ती व अन्नदान

**आषाढ मास –** आषाढ शु.॥ ५ ते ११ अखंड वीणासप्ताह, नामस्मरण, तुकाराम गाथा व ज्ञानेश्वरीचे पारायण व हरिपाठ, रात्रौ भजन, किर्तन (२) आषाढी एकादशीला श्री सखाराम महाराजांच्या लोणी येथील प्रथम आगमन स्थळाकडे ग्रामस्थांचे दिंडीसह प्रस्थान करुन तेथे भजन, किर्तन प्रसाद इ. (३) आषाढ शु ॥१२ ला श्री अच्युतानंद व सच्चिदानंद स्वामींच्या समाधीला अभिषेक व समाराधना, काल्याचे किर्तन.

**श्रावण मास –** ‘श्री’ च्या समाधीला श्रावण शु ॥५ ते भाद्रपद शु ॥२ पर्यंत **रोज लघुरुद्राभिषेक** (२) ‘श्री’ अच्युतानंद व सच्चिदानंदांच्या समाधीला तसेच लोमेश्वर शिवलिंग व हनुमान मुर्तिस एकादष्णी अभिषेक (३) ज्ञानेश्वरी पारायण व भागवत पुराण

**भाद्रपद मास –** भाद्रपद शु ॥४ ते १४– श्री गणेशमूर्तिची स्थापना, दोन्हीवेळेला आरती, भजन, किर्तन इ. (२) अनंत चतुर्दशीला श्री गणेशाची पालखी व विसर्जन (३) भाद्रपद व १२ ला **‘श्री’ चे पक्ष**

**कार्तिक मास –** (१) कार्तिक शु ॥१ – गोवर्धन पर्वत (२) कार्तिक स्नान व ‘श्री’ ला काकडारती (३) कार्तिक पौर्णिमेला पुराणाची समाप्ती .

**यात्रा महोत्सव–** (१) कार्तिक व ॥५ – यात्रेनिमीत्त महारुद्राभिषेक व जपाला प्रारंभ (२) कार्तिक व ॥११ ला **गरुडखांब स्थापना** (३) कार्तिक व ॥१४ **‘श्री’ चे श्राद्ध** (४) **कार्तिक व ॥ अमावास्या – ‘श्री’ ची पुण्यतिथी, समाराधना व महापंगत,**(५) मार्गशिर्ष शु ॥ १ **रथोत्सव व रात्रौ पालखी** (६) मार्गशिर्ष शु ॥२ जाकार ब्रह्मवृंद्यांची संभावना, वादक, कलाकारांना बिदागी, ज्ञानेश्वरीचे सामुहीक पारायणास प्रारंभ,(७)मार्गशिर्ष शु ॥३–प्रक्षाळपुजा व महाप्रसाद. लोणी संस्थानमध्ये गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षण,निवास,जेवण इत्यादींची विनामूल्य सोय केली जाते.गोरगरीबांच्या लग्न, मौज,जावळादि विधींसाठी खोल्या,बिछायत व सर्व सुविधा विनामूल्य पूरविल्या जातात.

# शाश्वत पुजा व शाश्वत अन्नदान

श्री सखाराम महाराज सेवा ट्रस्ट तर्फे भक्तांसाठी शाश्वत पूजा व शाश्वत अन्नदानाची व्यवस्था सुरु केली आहे. त्या अंतर्गत भक्तांनी दिलेल्या तिथी व तारखेला दरवर्षी अनुक्रमे ‘श्री’ च्या समाधीला अभिषेक व अन्नदान केले जाते.

**शाश्वतपूजा देणगी – रुपये ११०१ /–** **शाश्वत अन्नदान – रुपये ७००१ /–**

## ॥ अनुक्रमणिका ॥


| अध्याय | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ● | ग्रंथकर्त्यांचे चरित्र / लोणी संस्थान विषयी माहिती ● | |
| १ | मंगलाचरण, जन्म व बालपण | ०१ |
| २ | सखाराम वांझ गाईचे दूध पितो | ०८ |
| ३ | मौंजी समारंभ, खाल्लेले हरभऱ्याचे डहाळे पुन्हा लावले | १४ |
| ४ | गुरु बाळशास्त्री यांचे घरी वेदाध्ययन व गुरुला देवी भवानीचा साक्षात्कार | २० |
| ५ | लग्न समारंभ व तपश्चर्या | २७ |
| ६ | काशीला तपश्चर्या व मातेला भागीरथीचे दर्शन | ३३ |
| ७ | महाराजांचे पत्नीला दर्शन, लोणीस आगमन | ३९ |
| ८ | अप्पादेव व रायजीस चमत्कार | ४५ |
| ९ | भोलानाथास भगवंताचे दर्शन | ५१ |
| १० | १ शेर करडीपासून तेल काढून वाल्हू तेल्याचे दारिद्रय निरसन, पुंजाजी पाटलास उपरती. | ५७ |
| ११ | महाराजांच्या आशिर्वादाने व्यंकटेश पंताला पुत्रप्राप्ती, महाराजांचे निर्वाण | ६४ |
| १२ | दादाबुवांचे रुप घेऊन मजुरांस पैसे वाटले. | ७१ |
| १३ | नारायणराव मोहरीर व परशुराम खिस्ते ह्यांना चमत्कार, सिंहावलोकन | ७७ |
| ● | आरती / सखारामाष्टक | ८३-८६ |

॥ श्री सखाराम महाराज प्रसन्न ॥

# श्री सखाराम लीलामृत ग्रंथाचे कर्ते कै.रघुपती यांचे चरित्र

शके१८००(इ.स.१८७) मध्ये परमहंस श्री सखाराम महाराज अनंतात विलीन झाले. त्यानंतर अडतीस वर्षांनी महाराजांचे परमभक्त परभणीचे मंडलीक कुलोत्पन्न 'रघुपती' यांनी महाराजांच्या समाधी सान्निध्यांत **'श्री सखाराम लीलामृत'** ग्रंथ पूर्ण केला. त्यांचे कुलदैवत महाराष्ट्राची रामवरदायिनी श्री तुळजाभवनी आणि इष्टदैवत कैलास-निवासी भगवान श्री शंकर. रघुपतीच्या आजीचे नाव (बापाची आई) गीताबाई, वडिलांचे नांव रामकृष्णपंत आणि आईचे नाव लक्ष्मी होते. यासर्वांना अभिवादन करुन तेरा अध्यायात त्यांनी हा चरित्रग्रंथ लिहिला आहे.

लेखकांचे वडिल कै. रामकृष्ण मंडलिक ह्यांना सर्वजन 'पंत' म्हणून ओळखत. पंताचे पितृछत्र बालपणीच नाहिसे झाल्याने पंतांचे बालपण त्यांच्या आजोळी श्री. शोभने ह्यांच्या घरी परभणीलाच गेले. पंतांचा मुक्काम त्यांच्या पणजोळी चारठाण जवळच्या कान्हे ह्या गांवी असताना तेथे त्यांनी श्री. सखाराम महाराजांच्या साधुत्वाची कीर्ती ऐकली. जीवनाचे सार्थक करणाऱ्या अशा पर्वणी व्यक्तीच्या जीवनात योगायोगानेच येत असल्या तरी त्यात पूर्वसंचिताचाही भाग प्रामुख्याने असतो असे म्हणणे वावगे होणार नाही. पंत तडक लोणीस गेले. पंताचे वय १६ वर्षे व महाराजांचे वय ९० वर्षे. पंतांनी महाराजांचे दर्शन घेतले. त्यांनी ओळखले की हा साधक आहे परंतु परिस्थितीच्या ओढग्रस्तीत याची उभारणी झाकाळलेली आहे. विनम्र होऊन पंतांनी महाराजांना विचारले की 'मला नोकरी केव्हा लागेल' व 'माझे घर केव्हा उभे राहिल'. महाराज मोठ्याने हसले. त्यात उपरोध नव्हता तर प्रेम होते. त्यानी दोन तिथ्या सांगितल्या. पहिली नोकरीची व दुसरी लग्नाची. जवळच असलेले तांब्याचे दोन पैसे महाराजांनी पंताच्या हातावर ठेवले. पंतांना धन्यता वाटली. योगायोग

जुळत गेले. नोकरी लागली, लग्नही झाले व पंताचे घर उभे राहिले. प्रसाद फळाला आला. साहजिकच श्रद्धा वाढली. महाराज वयाच्या ९२ व्या वर्षी समाधिस्थ झाले तेव्हापासून पंतानी लोणीची वार्षिक वारी सुरु केली व आपल्या देहान्तापर्यंत अखंड चालविली. यात्रा, उत्सवादिक समारंभ ह्याची सर्व व्यवस्था पंत आपुलकीने पाहत असत.

ग्रंथकर्ता रघुपती पंताचा सर्वात थोरला मुलगा व आमचे जेष्ठ बंधू होते. त्यांचे बालपणापासूनच प्रपंचात लक्ष नव्हते. भजन कीर्तनात दंग असणे ही त्याची वृत्ती होती. त्याकाळच्या पद्धतीनुसार बालपणीच रघुपतीचे लग्न झाले. (त्यांना एकच विवाहीत मुलगी असून ती पंढरपूर येथे असते.) चारित्र्यशील व भगवतप्रेमी रघुपती ब्रम्हानंदात मग्न असे. महाराजांच्या जीवनातील मिळतील तेवढे प्रसंग आणि भक्तांच्या तोंडून कळलेल्या घटना एकत्रित करुन त्यांची कालक्रमानुसार मांडणी करुन तेरा अध्यायाची ओवीबद्ध चरित्र पोथी सिद्ध करणे हे सोपे काम नव्हते. परंतु त्यांना महाराजांचा साक्षात्कार होता. चरित्र रचनेच्या वेळी हे सर्व महाराजांच्या कृपेने अंत:करणातून आपोआप स्फुरते असे ते सांगत. महाराजांच्या कृपाशीर्वादाशिवाय ही ग्रंथ रचना अशक्य होती असे ते म्हणत.

आधुनिक महिपती संतकवी दासगणू महाराज आणि माहूर येथील विष्णु कवि ह्या दोघांचाही त्यांना सहवास लाभला होता. पुढे नोकरीनिमित्ताने रघुपती परभणी सोडून हैद्राबादला गेले. तेथे ते संत श्री भटजी बापू महाराजांच्या सान्निध्यांत रमले. त्यांनी भटजी बापूंकडून पार्थिव पुजेचे व्रत घेतले व ते आमरण चालविले. रघुपतीचे हैद्राबादेतच निधन झाले. तो दिवस फाल्गुन शुद्ध ११ शके१८४९ तथा दि. २ मार्च १९२८ हा होता. त्यावेळी रघुपतीचे वय केवळ अडतीस वर्षाचे होते.

महाराजांचे सगुण चरित्र रघुपतीने मोठ्या श्रद्धेने गाईले व तुम्हा आम्हासाठी ग्रंथरुपाने महाराजांना समूर्त केले. त्यामुळे श्री सखाराम महाराजांच्या अगणित भक्तांची नित्य पाठ व नामस्मरणाची भूक त्याने भागविली

**– कै गजानन मंडलीक / कै. सखाराम मंडलीक / भगवान मंडलीक**

## लोणी संस्थानच्या सध्याच्या कार्यक्रमाविषयी संक्षिप्त माहिती

श्री सद्‌गुरु सखाराम महाराजांचा जन्म तळणी (जि. जालना) येथे चैत्र शुद्ध नवमी १७०८ म्हणजे रामनवमीच्याच दिवशी (दि. ९ एप्रिल १७८६) झाला. वडिलांचे नाव बाळशास्त्री व आईचे नांव अहिल्या. त्यांचे वेदाध्ययन वाशिम येथे वे.शा.सं. बाळशास्त्री यांचेकडे झाले. बाळशास्त्री देवीचे उपासक. प्रत्यक्ष देवी भवानीने गुरु बाळशास्त्री यांना दृष्टांत देऊन सांगितले की सखाराम साधा विद्यार्थी नसुन तीन जन्मांचा महान योगी आहे. विद्याध्ययन संपल्यानंतर महाराजांचे लग्न ता. २१ नोव्हेंबर १८०० ला झाले. नाममात्र विवाह व हळदीचा डाग या दोन गोष्टी सोडल्या तर महाराज नैष्टिक ब्रम्हचारीच होते. ईच्छेविरुद्ध विवाह केल्यामुळे महाराजांनी गृहत्याग केला. पद्मतीर्थ (वाशिम), श्री पिंगलाक्षी देवीजवळ (रिसोड) व कमलजादेवीजवळ (लोणार) या पवित्र ठिकाणी व नंतर काशीला गंगेमध्ये जलस्तंभ योगाद्वारे महाराजांनी खडतर तपश्चर्या केली. काशीलाच त्यांनी मातेला भागीरथीचे दर्शन दिले. नंतर महाराज फिरत फिरत लोणीला आले. येथेच भोलानाथाला पांडुरंग दर्शन, एक शेर करडीपासून ७ मण तेल काढून वाल्हुचे दारिद्रय निरसन, फिटीजर, पुंजाजी पाटील, मोहरीर, राघो, बापू इत्यादिं अनेकांना चमत्कार दाखवून वयाच्या ९२ व्या वर्षी शके १८०० कार्तिक वद्य १४ ला (दि. २३ नोव्हेंबर १८७८) ला महाराज समाधिस्थ झाले. महाराज मितभाषी होते. ते कोणाला स्वत:च्या पाया पडू देत नसत वा फोटोही काढू देत नसत. त्यांनी कोणालाही गुरुमंत्र दिला नाही. पण आलेल्या भक्तांना जेवल्याशिवाय जावू देत नसत. भक्तांना जरी गोड धोड खाऊ घातले तरी त्यांची स्वत:च्या जेवणाची विशिष्ट पद्धत असे. अयाचित वृत्तीने आलेले डाळ, तांदूळ इत्यादि एकत्र करुन अर्धवट शिजल्यानंतर त्यातील अर्धा हिस्सा गोमाता श्वान इत्यादि प्राणीमात्राला दिल्यानंतर उरलेले अन्न स्वत: भक्षण करीत. या सर्व गोष्टींचे सविस्तर वर्णन प्रस्तुत ग्रंथात आलेलेच आहे.

श्री सखाराम महाराजांना संतती नव्हती कारण त्यांचा गृहस्थाश्रम व्रतस्थ अशा सिद्ध ब्रम्हचाऱ्याचा होता म्हणून त्यांच्या निर्वाणानंतर त्यांचे बंधू सीताराम व भगिनी जयंती यांच्या संततीने म्हणजेच श्री आबा महाराज व लक्ष्मण महाराज यांनी संस्थानचे काम चालविले. पुढे श्री रामकृष्ण नाना पाठक रिसोडकर यांनी आपला तिसरा मुलगा प्रल्हाद हा संस्थानला अर्पण केला. श्री. रामकृष्ण नानांच्या निर्वाणानंतर हाच प्रल्हाद लोणी संस्थानचा प्रमुख

होऊन त्यास '**प्रल्हाद महाराज**' या नावाने सर्व जनतेने मान्यता दिली. यांच्या हयातीत संस्थानात लोकोपयोगी अनेक कामे झाली. स्वत: प्रल्हाद महाराज संस्कृतचे व्यासंगी विद्वान असल्यामुळे त्यांनी **संस्कृत पाठशाला** सुरु केली. ज्योतिषशास्त्रचाही त्यांचा व्यासंग होताच. परंपरेला साजेशा सत्शीलतेने त्यांनी बहुजन समाजाच्या मनात स्वत:विषयी चांगलाच आदर निर्माण केला. श्रीमत् शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनी प्रल्हाद महाराजांची सेवातत्परता आणि लोकसंग्रहाची प्रवृत्ती पाहून त्यांना '**महापुरुष**' म्हणून गौरविले. श्री सखाराम महाराजांच्या पन्नासाव्या पुण्यतिथी पर्वणीचा मुहूर्त साधून **समाधीमंदीरावर सोन्याचा कळस** चढविला. नेहमीच शास्त्री पंडित आणि विद्वानांचा होणारा सत्कार यावेळी विशेष प्रमाणात झाला. एक सप्ताह हा सोहळा चालला होता. इ.स.१९५६ मध्ये प्रल्हाद महाराजांनी गंगा प्रदक्षिणा पूर्ण केली. मठाच्या वास्तुत पुष्कळच वाढ-विस्तार केला. भाविक यात्रेकरुंना त्रास होऊ नये म्हणून उत्तरद्वाराकडील प्रशस्त जागा विकत घेतली. म्हणून यात्रेकरु व दुकानदारांची चांगलीच सोय झाली. संस्थान व तेथील परंपरा या दृष्टीने प्रल्हाद महाराजांची कारकीर्द चांगलीच व लोकोपयोगी ठरली. दि.२ जुलै १९६३ रोजी त्यांचे निर्याण झाले.

प्रल्हाद महाराजांना तीन मुली व तीन मुले अशी संतती असुन तिन्ही मुलीचे विवाह झालेत व त्या आपापल्या घरी सुखात आहेत. प्रल्हाद महाराजांच्या निर्वाणानंतर त्यांचे चिरंजीव **रामकृष्ण तथा नाना महाराज** आज लोणी संस्थानचे प्रमुख आहेत. ते संस्कृत विद्या व पदवी विभूषित असून त्यांचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यासही आहे. यांना श्री शंकराचार्यानी '**महामानव**' ही पदवी दिली आहे. नाना महाराजांना त्यांच्या अल्पवयातच पत्नी वियोगाचे दु:ख झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शैलजाबाई यांचे निधन दि. १ ऑगस्ट १९८० रोजी वयाच्या केवळ ३२ व्या वर्षी झाले, बाईसाहेब अत्यंत आतिथ्यशील व महाराजांना अनुरुप व संस्थानच्या कारभारात दक्ष होत्या. त्या संस्थानच्या लक्ष्मीच म्हणवल्या जात.महाराजांचे धाकटे बंधू श्री बाळासाहेब आलेल्या भक्तांची मोठ्या आपुलकीने व जिव्हाळ्याने व्यवस्था करीत. संस्थानच्या सर्व कारभारात त्यांचे लक्ष असे. वयाच्या ४८ व्या वर्षीच त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनामुळे सर्वांना हळहळ वाटली.

शके १९००(इ.स.१९७८) मध्ये महाराजांचा शतसांवत्सरीक पुण्यतिथी महोत्सव साजरा झाला. त्या शुभ मुहूर्तावर नाना महाराजांनी विद्यमान समाधीमंदिरा समोर दोन मजली प्रशस्त सभामंडप उभारला. नाना महाराजांना

एक मुलगी व दोन मुले आहेत. सर्वजण सुशिक्षित व आस्थेवाईक असल्याने लोणी संस्थानचा कारभार व्यवस्थितपणे चालु आहे. कलाकार, वैदिक, पुराणिक, कीर्तनकार व विद्वानांचा यथोचित सत्कार आजही संस्थानात केला जातो. संस्थानतर्फे गरीब व होतकरु विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोयही केली जाते. नाना महाराजांच्या सत्शील व परोपकारी स्वभावामुळे संस्थान बहुजन समाजाच्या आदरास प्राप्त ठरले आहे.

## लोणी यात्रामहोत्सव

**अखंड मुक्त अन्नदान** हे संस्थानचे व्रत असून ते आजही अव्याहतपणे सुरु आहे. श्री सखाराम महाराजांचा **पुण्यतिथी महोत्सव** हा लोणी संस्थानचा प्रमुख कार्यक्रम आहे. त्यानिमित्त दरवर्षी लोणीला भव्य यात्रा भरते. ही यात्रा 'लोणी यात्रा' म्हणून सर्वदूर प्रसिद्ध आहे. यात्रेचे तीन दिवस प्रमुख असले तरी यात्रा जवळपास तीन आठवडे चालते. पहिल्या दिवशी **कार्तिक वद्य १४ ला महाराजांचे श्राद्ध** असते. **कार्तिक वद्य अमावस्या हा यात्रेचा प्रमुख दिवस. ह्या दिवशी महाराजांची पुण्यतिथी व महापंगत असते.** महापंगतीत मंदिराचे पूर्व व उत्तर महाद्वारासमोरील मोकळ्या पटांगणात हजारो लोक बसतात व त्यांना सेवेकरी भक्त पुरी, शिरा,भाजी इत्यादी महाप्रसाद वाढतात. स्वंयपाकाची सुरुवात दोन दिवस आधीच म्हणजे कार्तिक वद्य १३ ला होते. सद्‌गुरु सखाराम महाराज ज्या ठिकाणी बसून स्वयंपाक करीत त्याच ठिकाणी आजही महापंगतीचा स्वयंपाक गावोगावीचे भक्त मोठ्या भक्तिभावाने करतात. ह्या महापंगतीमधील पुरीच्या प्रसादाचे अनन्यसाधारण महत्व आहे. हा पुरीचा प्रसाद भाविक भक्त घरी नेऊन धान्यात ठेवतात. त्यामुळे धान्यास बरकत येते. अशी भक्तांची श्रद्धा आहे. तिसऱ्या दिवशी म्हणजे **मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेला 'रथोत्सव' व रात्रौ पालखी असते.**रथयात्रेचा उत्सव शके१८४७ (इ.स.१९२५)पासून सरु झाला.कै.रामकृष्णपंत मंडलीक(प्रस्तुत ग्रंथकर्त्याचे वडील)ह्यांनी परभणी येथे एक प्रचंड तीन मजली लाकडी रथ तयार केला,त्याचे सुटे भाग पंचवीस बैलगाड्यातून लोणीस नेले व तेथे तो रथ उभा केला.हा रथ शेकडो भक्त स्वत: हाताने ओढतात. रथ मिरवणुकीत अनेक प्रकारचे मान ठरवून देण्यात आले. रथ निघण्यापूर्वी पहिला मान महाराजांचा. त्यांना मंडलिकाकडून आदरपूर्वक आहेर केला जातो. नंतर सुताारास त्यानंतर प्रथम मंडलिकांना महाराजांच्या हस्ते कुंकु लावून मानाचे श्रीफल देण्यात येते. नंतर गावातील मानकरी व इतरांचा मानपान करण्यात येतो.आजही ह्याच परंपरेनुसार हा रथोत्सव लोणीस चालु आहे.

# अध्याय १ ला



देवभक्त बाल सखाराम

# ।। अथ श्री सखाराम लीलामृत प्रारंभः ।।



।। श्री गणेशाय नमः ।। श्री सरस्वत्यै नमः ।। श्री गुरुभ्यो नमः ।। ॐनमोजी गिरिजासुता । मंगलमूर्ती विघ्नध्वांता[1] । प्रतिभास्कर[2] तूं कृपावंता । शुभदायका गणेशा ।।१।। निजभक्तकनवळा किरीट । दिव्य शोभे शिरी सुभट । चतुर्दश विद्येचा थाट । हिरकण्यांचा तयावरी ।।२।। कंठी विलसे सुमनहार । चतु:षष्टी[3] कला अपार । जाईमालत्यादि हेच थोर । पुष्प तया गुंफिले ।।३।। पूर्ण ज्ञान जे देत तूर्ण । सायुज्यमुक्तीते जाण । तेच कटीसी वेष्टण । पीतवसन केलेसे ।।४।। पाशांकुश करी धारण । षड्रिपू[4] आणि अभिमान । भक्तांचे करण्या विदारण । एकरदना केलेसे ।।५।। पतिता पावन करणे । तव ब्रीद हे वदती पुराणे । ग्रंथारंभी करिता स्तवने । निर्विघ्न पावे सिद्धीते ।।६।। श्री सखारामलीलामृत । आरंभिला हा सुरस ग्रंथ । सिद्धीस जावा वाटे मनात । परी समर्थ नसे मी ।।७।। तव कृपा होय जरी । मम मनोरथ सत्वरी । पूर्ण होईल ही अंतरी । आशा बहु वसतसे ।।८।। परी मी कवण्या रीती कृपेसी । पात्र होईन न कळे मजसी । प्रेमे कैसे तव स्तवनासी । करावे हे नकळे की ।।९।। असो जैसे बालक अज्ञान । छंद घेत अट्टाहासे करुन । परी तयाचा तात तो पूर्ण । कौतुकपणे करितसे ।।१०।। तैसे माझ्या आग्रही हेता । सिद्धीस न्यावे दयावंता ।



---

१ विघ्नरुपी अंधकारास । २ दुसरा सुर्य । ३ चवसष्ट । ४ काम-क्रोधादिक शत्रू ।

लंबोदरा गिरीजासुता। अघमोचका गणपते ।।११।। आता नमू वाग्देवीसी[१] । जी न अव्हेरी
शरणागतासी। जिचीये कृपे काव्यासी। रसाळता येतसे ।।१२।। हे शारदे हंसवाहिनी। मतिमंदा
धी[२] येत झणी। मूकही बोले तत्क्षणीं। सर्वशास्त्रार्थ तव कृपे ।।१३।। जय जय सरस्वती कुमारी।
वास करी मम जिंव्हाग्री। रसभरित वदविण्या भारी। विरंचिकन्ये[३] ग्रंथ हा ।।१४।। हे देवी जगज्जननी
। तुळजापूरनिवासीनी। तूं माझी कुलस्वामिनी। चरणी नमी दास हा ।।१५।। करण्या निजभक्तरक्षण
। केला महिषासुर मर्दन[४] । आदिमाते कृपावलोकन । किंकरावरी करी या ।।१६।। आता नमू
पार्वतीरमण। जो मम इष्ट दैवत पूर्ण। शरीरी रुद्राक्षभूषण। आवडे जया शिवाते ।।१७।। शार्दूलचर्म[५]
अ कटीसी। भुजंगे वैष्टिले देहासी। शिरी धरिले जान्हविसी। भाळी रोहिणीपतिते[६] ।।१८।। हे निळकंठा २
१ मायामोचका। दक्षमखविध्वंसका[७] । अनादिसिद्धा भक्त पालका। गणेशजनका शंकरा ।।१९।।
भो योगी भाललोचना। त्रिशूलपाणी त्रिपूरमर्दना। पूर्ण करी माझी कामना। महादेवा जगत्पते
।।२०।। हे अप्पादेवा सद्गुरु। तूं मम पित्याचा मोक्षगुरु। दासासी केवळ कल्पतरु। अससी
तारु भवाब्धीचे ।।२१।। तुझे चिंतन प्रेमयुक्त। करी मी ठेवी कृपाहस्त। माझ्या शिरी कृपावंत।
संतराया दयाळा ।।२२।। श्रेष्ठ कवी या महीवर। एकनाथादि ज्ञानेश्वर। जे जे झाले थोर थोर।
चरणी नमन तयांच्या ।।२३।। असो आता या ग्रंथात वर्णूं श्री सखारामसंत। ज्यांची लीला सुरस

---

१ सरस्वती। २ बुद्धी। ३ ब्रम्हदेवाची मुलगी। ४ नाश। ५ व्याघ्रचर्म। ६ चंद्र। ७ दक्षाच्या यज्ञाचा नाश करणारा।

अत्यंत । श्रवणे मोद  होतसे ।।२४।। प्रभावती जिल्हामाझारी । तळणी[1]  नामक पुरी । तेथे विप्र
सदाचारी । बाळकृष्ण नामे वसतसे ।।२५।। यजुर्वेदी तो सात्विक । वत्सगोत्री असे देख । उदरपूर्तीचा
तया एक । मार्ग जोशीपणाचा ।।२६।। निजधर्मी तो निष्णात । अदांभिक नीतिवंत । ज्याचे असे
कुलदैवत । गणनायक विघ्नारी ।।२७।। तया असे पत्नी एक । महापतिव्रता ती देख । पुण्यशील
'अहल्या' नामक । सत्कर्मी प्रीति जीयेची ।।२८।। तिजला अपत्ये दोन । ज्येष्ठ सीताराम जाण ।
कन्या एक नामाभिधान । जिचे जयन्ती श्रोतेहो ।।२९।। पुढे कांही दिन लोटता । गर्भ जाहला राहता
। अहल्या पोटी तत्वता । सुदिन वेळेवरी तो ।।३०।। पूर्ण होता दोन मास । डोहाळे वदे ती पतीस ।
अ की मज वाटे अरण्यवास। आताचिया करावा ।।३१।। घडावे भागवतश्रवण । स्मरावा नित्य ३
१ गजानन । योगियांची संगत पूर्ण । रात्रंदिनी असावी ।।३२।। काशीक्षेत्री विश्वनाथ । पहावा वाटे
मनात । वंदावे जान्हवीप्रत । अघोर दोषा जी निवारी ।।३३।। ऐसे भार्येचे भाषण । परिसुनिया
बाळकृष्ण । म्हणे कोणी साधू पूर्ण । जनन घेतो वाटते ।।३४।। असो नवमास जाहले पूर्ण जन्मवेळा
संन्निध देखून । वैकुंठकैलासीचे सुरगण । येती आनंदे तया गृही ।।३५।। पुरंदर[2] निघाला निर्जरांसहित[3]
। सकल अप्सरांसमवेत । गंधर्वही गायन करीत । सदनी येत तयाच्या ।।३६।। गणनाथ नामे पार्वतीकुमर ।
कुलदैवत जे तयाचे थोर । ब्रम्हा विष्णु अपर्णावर [4] । सवे घेउनी पातला ।।३७।। सरस्वती ही निघे

---

१ एक खेडे (ता. परतुर, जि. जालना) । २ इंद्र । ३ देवासहित । ४ महादेव

अ १

सत्वरी । वीणा घेउनीया करी । हर्षभरे नाचे नृत्य करी । बाळकृष्णगृही तत्समयी ।।३८।। सर्व सुरवर आनंदयुक्त । करी घेउनि सुमनाप्रत । गुप्तरुपे तेथे तिष्ठत । म्हणती जन्मतो भक्तराणा ।।३९।। शके सतराशे आठांत[1] । पराभवनाम संवत्सरात । चैत्रमासी शुक्लपक्षात । नवमी तिथीस भृगुवासरी[2] ।।४०।। उदयासी येता वासरमणी[3] । सप्तघटी पंचपलांनी । बालक जन्मला वृषभलग्नी । पुष्यनक्षत्रावरी तो ।।४१।। सुरवर करिती वाद्यगजर । कल्पवृक्ष पुष्पे वर्षती अपार । गंधर्व नारद तुंबर । गायन कला आरंभिती ।।४२।। स्वरुपाचे वर्णन । करुनी तयाचे स्तवन । आशिर्वादिती परिपूर्ण । सर्व वृंद मिळोनी ।।४३।। हे अहेल्येचे बाळा । भाग्यवंता पुण्यशीला । अष्ट सिद्धी तव पदाला । नित्य वंदन करितील ।।४४।। चार वेद अठरा पुराणे । मुखोद्‌गत होती आमुच्या कृपेने । योगाभ्यासाचीही लक्षणे । कळती तुज लवलाही ।।४५।। भक्तांचा करण्या उद्धार । समर्थ होशील साचार । ऐसा श्रेष्ठ तूं महीवर [4] । साधू होशील बालका ।।४६।। ख्याती होईल त्रिजगती । सुरनर वर्णितील किर्ति । मिळेल तुज सायुज्यमुक्ती[5] । माहेर होशील भक्तांसी ।।४७।। ऐसे निर्जर वदोनी । सत्वर निघाले तेथुनी । गेले आनंदे स्वस्थानी । बालमहिमा वर्णित ।।४८।। धन्य अहल्या जननी । धन्य बाळकृष्ण पिता गुणी । की तो पुत्र ईश्वरालागुनी । अती आवडता जाहला ।।४९।। असो ज्योतिषी द्विजाप्रत । बाळकृष्ण पाचारित । म्हणे जन्मपत्रिका त्वरित । बालकाची करा या ।।५०।। जन्मवेळा केली कथन । ज्योतिष वदती ते ब्राम्हण । म्हणती हे बाळकृष्ण । वैभव तुझे थोर असे ।।५१।। महान साधू तुझा सुत । होईल हा

१ ता. ९ एप्रिल १७८६ । २ शुक्रवारी । ३ सूर्य । ४ पृथ्वीवर । ५ मोक्षाची चवथी अवस्था

४

जनविख्यात । तव कुल उद्धारार्थ । याचा जन्म सत्य गा ।।५२।। याच्या कृपे बहुत जन । तरती हे
निश्चित जाण । सुविद्या अवगत पूर्ण । होईल या बालका ।।५३।। परिसूनी ऐशी विप्रोक्ती[1] ।
बाळकृष्णाच्या आनंद चित्ती । जैसा श्रीरामजन्मे दशरथाप्रती । जाहला तैसा तत्वता ।।५४।।
असो द्वादश दिन येताक्षणी । बाळाचे नामकरणविधीलागुनी । पाचारिल्या द्विजकामिनी[2] ।
जयन्तीने स्वगृही ।।५५।। बाळ पाळणी निजविले । सखाराम नाम ठेविले । जो जो म्हणूनी
हालविले । अहल्येने तयाशी ।।५६।। सर्व सोहळा संपवूनी । नितंबिनी[3] गेल्या स्वस्थानी । असो
ते बालक वर्धे सदनी । शुक्लपक्षी इंदुसम[4] ।।५७।। बाल्यावस्थी[5] असे चित्त । ईशभजनी
अनुरक्त । क्रीडत असता मुलांत । काय करी तेधवा ।।५८।। घेत एक पाषाणमूर्ती । पूजी
अ मानुनी गणपती । पूजाद्रव्ये मृण्मय[6] असती । सखाराम बालका ।।५९।। भजन पूजन यथार्थ । ५
१ करी तो स्वमित्रांसहित । हे खेळ देखुनी विस्मित । बहुत जन होती पै ।।६०।। असो सीतारामचे
व्रतबंधन । केले अष्टवर्षी जाण । पुढे विवाहयोग येई जुळोन । बाळकृष्ण करी सिद्धता ।।६१।।
बालाजीचे पिंपळग्रामीचा [7] । जोशी एक काश्यपगोत्रीचा । तयाने गुजाबाई कन्येचा । केला
विवाह सीतारामसंगे ।।६२।। पुढे लोटता कांही दिन । अष्टीग्रामीचा[8] वर देखून । ज्याचे
मनभट नामाभिधान । जयन्ती तया अर्पिली ।।६३।। असो सिताराम वाणिज्याचा । उद्यम
करीतसे साचा । हे देखून मातापित्यांचा । आनंद विकसित होतसे ।।६४।। म्हणती यापासून

---

१ ब्राम्हणाचे भाषण । २ब्राम्हण स्त्रिया । ३ स्त्रिया । ४ चंद्रासारखे । ५ बाळपणी । ६ मातीची । ७,८ ही गाँवे परभणी जिल्ह्यात पाथरी तालुक्यात आहेत

निश्चित । सुख होईल आम्हाप्रत । याचे चित्त संसारात । अत्युतम असे पैं ।।६५।। करुनी हा प्रपंचासी । पात्र होईल सत्कीर्तिसी । संपादील विपुल द्रव्यासी । दानधर्म करील हा ।।६६।। ऐसे वदती सीताराम देखुनी । सखारामासी विलोकिताक्षणी । चित्ती अति दुःखित होऊनी । म्हणती हे न बरवे बालक ।।६७।। टाळ करितो पाषाणांचे । जमवी बालक अकिंचनांचे[1] । म्हणे हा गजानन सदा वाचे । याचे न बरवे खेळ हे ।।६८।। सदनी कधी न राहत । जायी सदा हा वनात । हे कैसे असे अघटित । खेळ याचे कळेना ।।६९।। ऐसे सदा पिता जननी । गांजीत शब्दे सखारामालागुनी । परी त्याचे कांही मनी । वाटत नसे तयाला ।।७०।। सीतारामाने विक्रयसदन[2] । खर्जूर श्रीफलादि[3] करुन । परिपूर्ण केलेसे जाण । विक्रयार्थ तेधवा ।।७१।। हे सखारामे



देखून । सहोदरा[4] एकांती नेऊन । करी तयाप्रती भाषण । की खर्जुरांते मज देई ।।७२।। वासना



मम सुहृदांची । तयावरी गेली साची । हे सीताराम परिसताची । नकार देई तयासी ।।७३।। मग सखाराम काय करी । देखिली संधी एका वारी । स्वमित्रांते तो झडकरी । खर्जूरफले देतसे ।।७४।। सीतारामे हे अवलोकिले । जे जे सखारामे केले । कर धरुनी त्यासी नेले । तत्क्षणी मातेसन्निध ।।७५।। आई शिक्षा करी याते । खर्जूरफले दिली परांते । स्वमुखी घाली किती त्याते । पाही आता लवलाही ।।७६।। ऐसेचि हा प्रतिदिनी । येवोनी करितो दुकानी । मी क्रोधावताक्षणी । ज्ञाने मज संबोधी ।।७७।। की वाणिज्यपणाचे । कर्तव्य नव्हे द्विजाचे । अध्ययन करी वेदांचे । गीर्वाण भाषा संपादी ।।७८।। ऐसे पुत्राचे भाषण । अहल्येने परिसून

---

१ दारिद्रयाचे । २ दुकान । ३ नारळ । ४ भावाला

सख्यास म्हणे लोका ज्ञान। वदसी परी अजाण तूं।। ७९।। कैसे कळेना बालका। व्यर्थ दिल्या परा खारिका। आता पुढती करी विवेका। ऐसे न करी कदापि ।।८०।। सखाराम करी अधोवदन। अश्रूंनी भरले असे नयन। म्हणे मी उपकृती करी पूर्ण। कैसे न कळे तुजलागी ।।८१।। जननी वदे हास्यमुख करुन। काय तू सांगसी मज ज्ञान। मी वडील असे तुजहून। जाणतसे सर्वही ।।८२।। स्वत: मिळवी धन। मग उपकाराचे ज्ञान। मजला सांगावे परिपूर्ण। ऐकेन बाळा तुझे ते ।।८३।। ऐसे ऐकता मातृवचन। सखाराम करी पलायन। स्वमित्रांते सवे घेऊन। काननी तो हिंडतसे ।।८४।। पुढील अध्यायी सुरस कथा। कर्णद्वारे पान करिता। आनंद श्रोतियांचे चित्ता। निश्चयत्वे होईल ।।८५।। स्वस्ति श्री सखारामलीलामृत। कर्ता करविता गिरिजाकांत। रघुपतीसी करुनी निमित्त। प्रथमाध्याय संपविला ।।८६।। श्री सखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।। प्रथमोध्याय समाप्त ।।

# अध्याय २ रा

## सखाराम मुलांना खाऊ वाटतो



सखाराम वांझ गाईचे दूध पितो



।।श्री गणेशाय नमः।। हे वृषभध्वजा त्र्यंबका । पंचवदना मदनांतका ।
गंगाधरा अघमोचका । दास वंदी तव पदी ।।१।। प्रथमाध्याय तो जाण ।
संपला तव कृपेकरुन । स्फूर्ती द्यावी मजला पूर्ण । पुढती काव्य रचावया
।।२।। मागील अध्यायी झाले कथन । गणेश सरस्वतीचे स्तवन । खर्जूरफले
स्वमित्रा देऊन । सखाराम गेले काननी ।।३।। स्वसख्यांसी घेऊन । बैसला
वृक्षाखाली येऊन । म्हणे मम बंधू कैसा कृपण । ध्यानी आलेच तुमच्या ।।४।।
खर्जूरफले तुम्हा अर्पण । केली ते न झाले सहन । मम भ्राता करी निवेदन ।
मातेसन्निध जाउनी ।।५।। तयाचे वेधले अति चित्त । द्रव्य सौख्यसंसारात । जरी उपकार न करी किंचित
अ । कैसा उद्यम चालेल ।।६।। जितुके मिळे मानवासी । त्यातील जाण चतुर्थांशासी । धर्मव्यय करावा ८
२ रीत ऐशी । बरकत येण्याकारणे ।।७।। धर्म मृत्यूस दूर सारी । धर्म गंडांतरे वारी । धर्माने होताती दुरी । सर्व
पातके प्राणियांची ।।८।। धर्म करी त्या ईश्वर तारी । जो धार्मिक त्याचे घरी । ऋध्दि सिध्दी राबती
सर्वपरी । कांही न उणे तयासी ।।९।। किती वर्णु धर्मासी । सांगू गड्यांनो तुम्हासी । परी हे न कळे मम
बंधूसी । तयासी काय करावे ।।१०।। हे परिसोनी धर्मज्ञान । झाले चकित मित्र पूर्ण । म्हणती हा बाळ
असोन । उपदेश कैसा करितसे ।।११।। मध्यान्हीचा अर्क देखून । उठेल तेथून सर्व जण । गेले ते
स्वगृहालागोन । भोजनार्थ लवलाही ।।१२।। सखारामासी देखून । बोले तया बाळकृष्ण । की बाळा
तुज आठवण । नाही कैसी भोजनाची ।।१३।। दरिद्रियांची संगत । धरुनी फिरतो वनांत । राहतो सदा

पिशाच्चवत । कांही न घरची काळजी ॥१४॥ सांगे सीतारामा त्वरीत । बैसवुनी दुकानात । हिशेबलेखन थोडेबहुत । शिकवित जावे यालागी ॥१५॥ भोजन तयाचे संपताक्षणी । सीताराम नेत तया झणी । बैसवुनिया दुकानी । हिशेबलेखन शिकवीतसे ॥१६॥ असे सखारामा तेथे ठेवून । सीताराम काही कार्या जाण । गेला ही संधी देखून । सखाराम पाचारी गरिबांते ॥१७॥ कोणासी दिधली डाळ । कवणा वदे घ्या तांदुळ । कोणा अर्पीतसे गुळ । स्वकराने आनंदे ॥१८॥ घेऊनी पळारे लवकरी । येईल सीताराम झडकरी । ऐसे वदे तोच दुरी । निजबंधूसी देखिले ॥१९॥ सखारामाचे हे कृत्य जाण । सीतारामे अवलोकून । क्रोधावला मनी पूर्ण । परी न शिक्षा करवे त्या ॥२०॥ मग तया सवे घेऊन । स्वगृही जातसे धावून । मातेप्रती करी

अ २ निवेदन । घडले असे जसे ते ॥२१॥ ऐकता क्षणी जननी त्वरित । करी शिक्षा सखारामाप्रत । ९

बालक सांगतसे रडत । व्यर्थ मज का गांजिता ॥२२॥ मी न अपराधी किमपि जननी । आळ घातली ही दादांनी । पाही बरे आतां दुकानी । सर्व वस्तू दाविते ॥२३॥ ऐसे वदोनी अहल्यासुत । गमन करी मातेसहित । वस्तू दाविल्या यथास्थित । जणो कांही न खर्चिल्या ॥२४॥ मातेस हे सत्य वाटले । सितारामा अनृत ठरविले । तैं तो चकित होऊन बोले । काय चमत्कार न कळेची ॥२५॥ ऐसी अद्‌भुत कृती विलोकून । तया सितारामाच्या जाण । चित्ती बाणले सखाराम पूर्ण । साधु निश्चये असावा ॥२६॥ मी व्यर्थ छळिले यासी । पात्र झालो दोषासी । आतां ऐकेन वचनासी । जे जे वदे सखाराम ॥२७॥ असो सखारामरायास । अवलोकिता स्वमित्रास । वाटतसे अति संतोष । खेळ अनेक खेळावया ॥२८॥ गरीब आणि सात्त्विक ।

ईश्वरभजनी श्रद्धा देख । ज्याची असेल त्याची चोख । मैत्री धरी सखाराम ।।२९।। ऐशिया सुहृदांची
जाणा । सखाराम पुरवी कामना । जो जी धरील वासना । तात्काळ सिद्धीस जातसे ।।३०।। जैसे
मित्र श्रीकृष्णाते । पेंद्या सुदामादी होते । त्यांच्या पुरवी हेतूते । गोकुळामाजी श्रीहरी ।।३१।। दधि
दुग्ध देऊनी तृप्त । करी जैसा यशोदासुत । तैसेच सखाराम आचरित । सुखवी सदा सवंगडया
।।३२।। येविषयीचा इतिहास । ऐका श्रोते सावकाश । होईल पातकांचा नाश । भक्तियुक्त परिसता
।।३३।। सखारामरायाप्रत । दुग्धाची आवडी असे बहुत । प्रतिदिनी तो पान करित । कधी न राही
तयाविणे ।।३४।। असो तया गृही धेनू बहुत । असती जाणा गुणवंत । सिताराम हा धार काढित ।
नित्य नेमे करुनिया ।।३५।। उठोनी प्रभाती वेगेसी । सखाराम जात धेनूपाशी । मुखी घेऊनिया
अ स्तनाशी । पय:पान करीतसे ।।३६।। मुख लागता धेनुस्तनी । पान्हा सोडीतसे ती झणी । तया बाळा १०
२ पय:प्राशनी । मोद अती होतसे ।।३७।। ऐसा क्रम बहुत दिवस । चालला न कळे कोणास । एके दिनी
प्रभात काळास । मित्र आले तयाचे ।।३८।। देखतां ते सखारामाप्रती । म्हणती अघटित किती ही
कृती । कोणी न पाहिले ऐसे निश्चिती । दुग्ध प्राशिता आम्ही बा ।।३९।। तया जवळी ते जाऊन ।
म्हणती सखारामालागून । आम्हांसी तू चोरुन । का प्रशिसी पयाते ।।४०।। तूं कधीही आम्हा सोडून
। कांही न भक्षिसी जाण । आता का माया पूर्ण । सोडिली आमुची दयाळा ।।४१।। सखाराम म्हणे
गोंगाट । करु नका न धरा हट्ट । येईल माझी जननी निकट । गड्यांनो तुम्ही शांत व्हा ।।४२।। तया
सर्वा बैसवून । तृप्त केले पय देऊन । 'पुरे' 'पुरे' ऐसा शब्द परिसून । पळा आता म्हणतसे ।।४३।। ऐसे

नित्य पय:पान । चालविले सख्याने जाण । परी एकदा सोहळा पूर्ण । देखिला तयाचे बंधूने ।।४४।।
मातेसी सांगे सीताराम । नित्य आपुला सखाराम । सवंगड्या सवे घेऊनी काम । पुरवितसे दुग्धाने
।।४५।। पाहणे असेल तुज जरी । मजसवे चाल सत्वरी । दावितो सखारामा झडकरी । मुलांसमवेत
गोशाळी[1] ।।४६।। ऐसे ऐकता तत्क्षणी । निघाली पुत्रासवे जननी । वदे तयाजवळी येऊनी । अरे हे
काय करिसी तूं ।।४७।। लज्जा नसे रे तुज कैसी । मागील शिक्षा विसरलासी । अजुनी तु खोडी ऐसी
। करितोसी कारट्या ।।४८।। येरु[2] वदे तिजलागून । अपराध झाला मजकडून । क्षमा करी गे मज
माते जाण । न करी ऐसे पुनरपी ।।४९।। मग त्या दिवसापासून । सखाराम करी स्पर्श न । तया
अ धेनुसी जाण । एक मासपर्यंत ।।५०।। ज्या गौतमीसी स्पर्श नाही । ती लवही न दे दुग्ध काही । हे ११
२ देखूनी लवलाही । चकित होय सिताराम ।।५१।। की ते दिवसापासून । धेनु का स्त्रवेची दुग्ध न । दृष्ट
झाली असे जाणुन । सखाराम मित्राची ।।५२।। वैद्यासी आणिले त्वरित । म्हणे पहा या धेनुकेप्रत
। दुग्ध नच दे ती किंचित् । उपाय काय योजावा ।।५३।। सितारामसी भ्रमणी । कैसी पडली असे झणी
। देखूनी पूर्वीची करणी । सखारामरायाची ।।५४।। जैसा नंदगृही वनमाळी । राहे सदा यशोदेजवळी ।
मुखी असंख्य दैवते दाविली । परी न कळे तो ईश्वर ।।५५।। तैसे माता भ्रात्यास झाले । न कळे भाग्य
उदयासी आले । केवळ मुक्तिद्वार मिळाले । नाही कळाले तयासी ।।५६।। असो सीतारामे धेनूसी
दाखविले बहू जनांसी । केले अनंत उपायांसी । परी सर्व निरर्थक ।।५७।। इकडे सखाराम काय करी ।

१ गाईच्या गोठ्यात । २ सखाराम

वंध्या धेनू होती घरी । तिचे दुग्ध काढोनी झडकरी । मित्रवांच्छा पुरवितसे ।।५८।। श्रोते तुम्ही व्हाल चकित । शंका आणाल मनात । की ऐसे कैसे अघटित । सखारामे केले असे ।।५९।। ईश्वरभक्त म्हणावा जरी । हरिभाक्ति केली कधी तरी । जे हिंडती गिरिकंदरी । त्यांसी न मिळे अधिकार हा ।।६०।। कोणी यज्ञयाग करिती । कोणी भागवतसप्ताह आरंभिती । कोणी नामसप्ताह उभारिती । परि न लाधे अधिकार हा ।।६१।। कोणी करिती अनुष्ठाण । कोणी पूजिती पंचायतन । कोणी करिती नामस्मरण । राम हरे शंकर ।।६२। कोणी करिती श्रवणभक्ति । कोणी करिती वंदनभक्ति । कोणी हरिकीर्तनी नाचती । प्रेमानंदे करुनिया ।।६३।। ही तरी सखारामाची मूर्ती । अवघी पांच वर्षाची होती । कधी केली पराभक्ती[1] । कधी अधिकार संपादिला ।।६४।। ऐका श्रोते चित्त देउनी । सखाराम बहू जन्म घेउनी । ईशभक्ती पूर्ण करोनी । अधिकार ऐसा संपादिला ।।६५।। ऐसे वदली जगज्जननी । सखाराम गुरुलागुनी । हे चतुर्थाध्यायाचे ठिकाणी । विषदरुपे[2] ऐकाल ।।६६।। असो श्रीसखारामाचा । नित्यक्रम दुग्धपानाचा । अस्खलित[3] चालला साचा । बहुत दिनपर्यंत ।।६७।। ज्या धेनूसी नाही स्पर्श । त्या देखता सखारामास । हंबरोनी हलविती पुच्छास । हातभागी किती म्हणोनी ।।६८।। असो एकदा अहल्येने । अकस्मात देखिले नयने । की वंध्या धेनूपाशी तनयाने । काय केले जाउनी ।।६९।। मातावदे वत्सा तुज कांही । पय न लभ्य होय लवही । जैसे दरिद्रियासमीप पाही । धन न मिळे कवणाते ।।७०।। ऐसे मातृवचन परिसोन । सखाराम करी सुहास्यवदन । म्हणे आतांचि करी अवलोकन दुग्धालागी दोहितो ।।७१।। ऐसे बोलून तत्क्षणी । चार शेर दुग्धाते झणी । दोहिले

१ श्रेष्ठ भक्ती । २ विस्तृत । ३ अडथळा न येता

सखारामरायांनी । आश्चर्य जननी करीतसे ।।७२।। चित्ती म्हणे हा  नव्हे बाळ । प्रत्यक्ष शिवभक्त दयाळा । मज कैसी गे भुरळ । पडली असे आजवरी ।।७३।। सखयास म्हणे सर्व धेनूंचे । नित्य पय काढावे साचे । हे ऐकूनिया तयाचे । चित्त संतोषित जाहले ।।७४।। मात्राज्ञा होता जाण । सिताराम करी भाषण । म्हणे आज दुग्ध काढून । पाही बहूत निघेल ।।७५।। सिताराम वदे असंख्यात । उपाय केले परि न किंचित । दुग्ध येई धेनु स्तनांत । कोठुनी आज निघेल ।।७६।। असो सखयाचा आग्रह देखुनी । सीताराम काढी दुग्धालागुनी । बहुत पय निघाले ते दिनी । बंधू विस्मित होतसे ।।७७।। म्हणे सखया काही मंत्र । जाणतोसी वाटे तंत्र । अथवा कळतसे यंत्र । साधन काही करायाचे ।।७८।। येरु वदे स्वकुलदैवत । त्यासी मी स्मरे निश्चित । मंत्र ना तंत्र ह्या व्यतिरिक्त । सत्य सत्य त्रिवाचा ।।७९।। तूं आता प्रतिदिवशी । काढीत जावे दुग्धासी । न्यून न पडे निश्चयेसी । क्रम हा चालवी सीताराम ।।८०।। पुढील अध्यायी कथा  सुरस । श्रोते परिसा सावकाश । जी संहारील पातकास । निश्चयत्वे जाण पैं ।।८१।। स्वस्ति श्रीसखारामलीलामृत । कर्ता करविता गिरिजाकांत । रघुपतीसी करुनी निमित्त । द्वितीयाध्याय संपविला ।।८२।। श्री सखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।

## द्वितीयाध्याय समाप्त ।।

# अध्याय ३ रा

## खाल्लेले हरभऱ्याचे डहाळे पुन्हा लावले





मौंजी समारंभ



श्री गणेशाय नमः ।। जय जय भोलानाथ शंकरा । शूलपाणी दयासागरा । विश्वपालका जोडुनी करा । नम्र झाला दास हा ।।१।। मम सुखालय[1] तूंच । मजलागी जीवन तूच । तव कृपे करुनी साच । अध्यायद्वय बोलिलो ।।२।। तुज गाता शिणला शेष । अंत न लागे वेदांस । समर्थ नच मी वर्णण्यास । म्हणून वळतो कथेकडे ।।३।। मागील अध्यायी झाले कथन । वंध्या धेनूचे दुग्धदोहन । केली मित्रांची इच्छा पूर्ण । सखारामरायांनी ।।४।। ऐका पुढती काय वर्तले[2] । सखारामे एकदा देखिले । गोवत्स अतृप्तचि बद्ध केले । सिताराम बंधूने ।।५।। मग तो द्वितीय दिनी । सिताराम देखताक्षणी । सर्व गोवत्स[3] सोडिले झणी । पय प्राशनाकारणे ।।६।। सितारामे अवलोकून । मातेसी सांगे वर्तमान । की मी दुग्ध काढावया जाण । गौतमीसन्निद्ध जातसे ।।७।। इतुक्यामाजी सखा येऊन । सर्व गोवत्स सोडिले जाण । केले सर्व पय प्राशन । कांहीच नुरले स्तनांत ।।८।। ऐसे माता परिसुनी । क्रोधावली अंत:करणी । म्हणे आता शिक्षा झणी । करणे योग्य तयासी ।।९।। मग सख्यासन्निध जाऊन । करी तयाप्रती भाषण । का गोवत्स सोडिले जाण । पय न निघे अणुमात्र ।।१०।। तो म्हणे वत्सांची कधीही । तृप्तता जाहली नाही । दुग्धपानाने तूं पाही । म्हणूनी तया सोडिले ।।११।। जरी पय प्राशिले तयांनी । तरी न्यून नसे किमपी स्तनी । अनृत तुज हे वाटे जननी । परि काढूनि पाही तू ।।१२।। तैसेच तियेने केले । दुग्ध

१ सुखाचा आधार। २ घडले । ३ गाईची वासरे

अपार निघाले । देखूनि हे बहु वाटले । आश्चर्य तै जननीते ॥१३॥ चमत्कार होती प्रतिक्षणी । परी
कां पडे ऐशी भ्रमणी । असे ही मायेची करणी । सखारामरायाच्या ॥१४॥ जैसी गोकुळी कृष्णानी
। अघटीत कृती दाऊनि । मग माया पूर्ण घालूनी । भ्रम जनांसी पाडावा ॥१५॥ तैसेचि सखाराम
बालक । अघटित कृती करिते देख । श्रोतेहो तुम्ही सकळीक । परिसा सावध होऊनि ॥१६॥ एकदा
ऐसे वर्तमान । घडले असे की जाण । सखाराम बालकांते घेऊन । काननात [१] जातसे ॥१७॥ पथ
क्रमिता एके ठिकाणी । चणकवृक्ष [२] देखिले नयनी । मित्र म्हणती तयालागुनी । वासना जात
तयावरी ॥१८॥ सखाराम म्हणे सुहृदांसी । मी असता तुम्हापासी । कासया करिता चिंतेसी । कांही
न उणे तुम्हाते ॥१९॥ ऐसे वदून तयाप्रत । चला म्हणे या क्षेत्रात [३] । मग येऊनिया त्वरित । चणकवृक्षा
अ घेती ते ॥२०॥ तेथेच बैसले सर्व जण । चणक [४] भक्षिती मुदित होऊन । कोणी म्हणती रक्षक तूर्ण [५] । १५
३ येईल पलायन करावे ॥२१॥ जाऊ कोठे एकांती । टहाळ भक्षू निश्चिती । येथे चित्तास शांती ।
मिळेल ऐसे न वाटे ॥२२॥ सखाराम म्हणे मी वदतो स्पष्ट । ठेवा तुम्ही पूर्ण धारिष्ट्य । मग तुम्हा
कोणतेच कष्ट । न होती बा सर्वथा ॥२३॥ ऐसे भाषण परिसोनी [६] । विश्वास ठेविती तद्वचनी । बैसले
बालक तये स्थानी । चणक प्रेमे भक्षित ॥२४॥ कोणी घाटे तोडूनी । कोणी चणक कवचा काढोनी
। देती सखारामालागुनी । अत्यानन्दे करुनिया ॥२५॥ सखारामही तयाप्रती । ऐसेच देई धरुनी प्रीती ।
धिरटया घालून सभोवती । सर्वत्रासन्निध जातसे ॥२६॥ कोणी आनंदे नाचती । कोणी सुस्वर

१ अरण्यांत ।२ हर भरा । ३ शेतांत । ४ हरभरे । ५ आता, लवकर । ६ ऐकून

गायन करिती। कोणी चणक पुरे म्हणती। क्रीडा कांही आरंभा ।।२७।। इतुक्यामाजी रक्षकांनी। जो
केलासे आक्रोश वदनी। तो बालकांच्या पडता कर्णी। त्वरित आनंद निघाला ।।२८।। जैसे परिसून
हरीकिर्तन। आनंदे डोलती भक्तजन। तैशात रंगभंग खळे येऊन। करावा तैसे जाहले ।।२९।। असो
रक्षक आला धाऊन। बालकांसी करी भाषण। की मी तुम्हा ताडण। करीन आता निर्धारे ।।३०।।
सखारामा धरिले त्यांनी। वदे यात तूचि शिरोमणी। आलासि सर्वांते घेऊनी। चणकवृक्षा नशिले
।।३१।। जरी वृक्षा लाऊनी देशी। तरीच तूं मुक्त होशी। नाही तरी योग्य शिक्षेसी। पात्र झालासी
चोरटया ।।३२।। ऐसे पुरुष वचन। सखारामे परिसून। आळविला गिरिजानंदन। करी घेई वृक्षांते
।।३३।। म्हणे मी तुज संपूर्ण। लावून देतो तया जाण। मग ते भूमीत रोवून। दिले जैसे पूर्ववत ।।३४।।
टवटविले वृक्ष जाण। घाट्यांनी ओथंबले[1] पूर्ण। ऐसे रक्षके देखून। विस्मित मनी होतसे ।।३५।।
अनुताप जाहला तयासी। नमूनी सखारामपदासी। म्हणे वृथा छळिले तुम्हासी। सदनी जावे
बालकांनो ।।३६।। ऐसी चमत्कृति दावून। सखाराम मित्रांते घेऊन। गेले स्वसदनालागून[2]। प्रेमानंदे
क्रीडत ।।३७।। ऐशी सखारामे बाळपणी। क्रीडा केली स्वैर गतीनी। पुढती कैसी तयांनी। केली
परिसा सावकाश ।।३८।। बाळकृष्ण योजी अंतरी। की द्विजत्व[3] द्यावे सत्वरी। सखाराम
बालकाभीतरी। विहीत धर्मानुसारे ।।३९।। ऐसा विवेक करुन। पाचारी द्विज विद्वान। म्हणे सुमुहूर्त

---

१ फलभाराने वाकले । २ आपल्या घरी । ३ मौज

द्या पाहून । व्रतबंधाकारणे [१] ।।४०।। विप्र शास्त्रार्थ देखून । बाळकृष्णा करिती भाषण । शके सत्राशे पंधरात [२] जाण । माघात व्रतबंध आरंभी ।।४१।। कृष्णपक्षी पंचमी तिथीसी । मंगल कार्य करी निश्चयेसी । बाळकृष्णे मानिले वचनासी । सर्व सिद्धता आरंभिली ।।४२।। पत्रिका धाडिल्या आप्तजनी । मंडप उभारिला अंगणी ।पाचारिले ते सर्व येउनी । आरंभिती मंगल कार्य ।।४३।। सुमुहूर्त येता तत्क्षणी । विप्रे मंगलाष्टके म्हणोनी । अक्षता टाकिल्या प्रेमानी । सावधान म्हणोनी ।।४४।। टाळ्यांचा होत गजर । वाद्यध्वनी गर्जे अपार । बाळकृष्णे उपदेशिला कुमर । गायत्रीमंत्र देऊनी ।।४५।। पक्वान्नभोजन देऊन । संतृष्ट केले द्विजांलागून । दक्षिणेसहित तया जाण । यथानुशक्ति सर्वांसी ।।४६।। असो कांही दिवसांनी । वेदाभ्यासाकारणी । बाळकृष्ण स्वपुत्रा घेऊनी । गेले वत्सगुल्मासी ।।४७।। धन्य धन्य ते वाशीम क्षेत्र । वाराणशीसम पवित्र । जेथे श्रीव्यंकटेश सकलत्र [३] । मुर्तिमंत वास करी ।।४८।। तेथे बाळशास्त्री द्विज प्रख्यात । वैदिक शास्त्रज्ञ पंडित । नक्षत्री जैसा रोहिणीकांत [४] । विद्वानांत तयापरी ।।४९।। करी देवीसमाराधन । श्रीजगदंबा ज्यास प्रसन्न । दया क्षमेचा निधी [५] जाण । विदेही स्थिती जयाची ।।५०।। जैसे वदे तयाची वाणी । ती न अनृत कदापी जनी । केवळ कमलोद्‌भवाची [६] वाणी । इतिहास ऐका येविषयी ।।५१।। तया वाशिम ग्रामात । आश्वलायनशाखी गृहस्थ । असे तेथे नामांकित ‘महादेवशास्त्री’ म्हणूनी ।।५२।। उपनाम ‘लोथे’

---

१ मौजीला । २ दि. २२ फेब्रु.१७९४ । ३ लक्ष्मीसह । ४ चंद्र । ५ साठा । ६ ब्रम्हदेवाची

ज्याचे । नाम तयाच्या पुत्राचे । प्रल्हादअण्णा [1] साचे । पितृसेवेशी दक्ष जो ।।५३।। बाळशास्त्राचे आचरण । महादेवे देखून । भक्ती जडली त्यांची पूर्ण । उपदेशही घेतला ।।५४।। असो ते 'लोथे' गुरुसी । भजती तदा अहर्निशी [2] । कधी न ते वचनासी । मोडिते झाले तयांच्या ।।५५।। पुढे कांही दिवसांनी । लोथे लागले गुरुचरणी । म्हणती मुहूर्त द्या पाहूनी । व्रतबंधार्थ पुत्राच्या ।।५६।। शिष्यभाषण परिसोनी । त्याचा विश्वास मम वचनी । कसासी [3] लावावा म्हणोनी । वदते झाले तयाला ।।५७।। व्यतिपात होता ज्या तिथीसी । तीच कथिली निश्चयेसी । ह्या व्यतिरिक्त अन्य दिवशी । व्रतबंध करु नये ।।५८।। परिसोनिया गुरुवचना । आला सत्वर स्वसदना [4] । पत्रिका पाठवी
अ आप्त जना । विद्वान द्विजां सत्वरी ।।५९।। पत्रिकेते अवलोकून । विप्र क्रोधावले पूर्ण । म्हणती ही १८
३ तिथी कवणे जाण । अविचारे अज्ञे [5] दिधली ।।६०।। ऐसा विचार करुन । आले यजमान गृहालागून । म्हणती वेडिया पूर्ण । विवेक करी लवलाही ।।६१।। बघ तूं आश्वलायन । कैसा नच शाखाभिमान । गुरु केले बाळाजीलागून । माध्यंदिनीय शाखी जो ।।६२।। त्याने फसविले तुजसी । तिथिनिश्चय व्रतबंधासी । जो केलासे ते दिवशी । साक्षात असे व्यतिपात ।।६३।। नानापरीची विडंबना । करुनी व्यथित केले मना । तया महादेवाच्या जाणा । तोही मनी संकोचे ।।६४।। परी न त्याचा निश्चय चळला । भीरुत्व स्पर्शो न दे अंगाला । कैसा भंगू गुरुवचनाला । विवेक चित्ती करीतसे ।।६५।। गुरु विसरले निश्चित । म्हणोनीच नेमिला व्यतिपात । हे जाणोनिया त्वरीत । सत्वर जात गुरुगृही ।।६६।।

---

१ हल्ली यांची समाधी गिरोली येथे आहे । २ रात्रंदिवस । ३ परिक्षेस । ४ आपल्या घरी । ५ मूर्खांनी

गुरुस वदे कर जोडून । जी तिथी नेमिली आपण । ते दिवशी व्यतिपात जाण । व्रतबंध कैसा करावा ।।६७।। सद्‌गुरुने हे परिसून । तयाचे ते मधुर वचन । म्हणे मी विवेक करुन । तिथी नेमिली योग्य ती ।।६८।। ज्याचा व्रतबंध ह्या तिथीस । होय तो विख्यात सत्पुरुष । जगद्वंद्य प्रिय ईश्वरास । होईल हे निश्चये ।।६९।। ऐसे ऐकून तद्वचन । लौकिकलज्जाही सोडून । गुरुवचनी विश्वासून । व्रतबंध त्याने आरंभिला ।।७०।। लोक गदगदा हासती । भ्रष्ट झाला ऐसे म्हणती । त्याची न तो धरी खंती । व्रतबंध केला स्वसुताचा ।।७१।। ह्यासी होता कांही दिन । झाले सत्य गुरुवचन । प्रल्हादअण्णा साधू पूर्ण । झाले असे विख्यात ।।७२।। ऐसा बाळशास्त्र्यांचा अधिकार । जया योग्य शिष्य चतुर । लाधला बाळकृष्णकुमर । तीव्रतम बुद्धीचा ।।७३।। जैसे श्रीरामचंद्र वसिष्ठासी । की श्रीकृष्ण सांदीपनांसी । शिष्यवर लाभले बहुगुणराशी । तद्वतच तया सखाराम ।।७४।। असो सखारामालागुनी । वत्सगुल्मी ठेविले बाळकृष्णांनी । तया बाळशास्त्री यांचे सदनी विद्याभ्यासाकारणे ।।७५।। पूढील अध्यायी वेदाध्ययन । सखाराम करील जाण । साक्षात्कार देवीकडून । होईल बाळशास्त्र्यांसी ।।७६।। स्वस्ति श्रीसखाराम लीलामृत । कर्ता करविता गिरिजाकांत । रघुपतीसी करुनी निमित्त । तृतीयाध्याय संपविला ।।७७।। श्री सखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।। तृतीयोध्याय समाप्त ।।

# अध्याय ४ था



बाळाशास्त्री भागवत सांगतात



।। श्री गणेशाय नम: ।। जय जय श्रीकैलासनाथा । महादेवा दीनानाथा । जरी तव प्रसन्नता । होय तरीच ग्रंथ वाढे ।।१।। उपेक्षिसी तू मजला जरी । मग विनवू मी कोणा तरी । जैसे माता बालकावरी । कोपता कोठे जाय ते ।।२।। मागील अध्यायी झाले कथन । की गुरुगृही गेला अहिल्यानंदन । करु लागे वेदाध्ययन । एक चित्ते करुनिया ।।३।। विद्यार्थीवृंद जो तेथ । तयामाजी बहु धूर्त । दिसे तो अल्पवयात । कुमर बाळकृष्णाचा ।।४।। ह्याची चपल मती देखून । शास्त्री चकित होती जाण । सखारामावरी पूर्ण । प्रीती जडली गुरुची ।।५।। सखाराम बुद्धीमंत । मुहूर्तमार्तंड ज्योतिष्यग्रंथ । तो याने एकाच दिनांत । मुखोद्गत केलासे ।।६।। ऐसी अलौकीक देखुनी मती । शास्त्री विवेक करिती चित्ती । हा पूर्वजन्मी कोणी म्हणती । साधू श्रेष्ठ असावा ।।७।। असो बाळशास्त्री चित्त । एकाग्र करुनी ध्यानस्थ । अष्टभुजा पूजनात । असता कैसे जाहले ।।८।। त्याची पूर्ण भक्ति देखुनी । सुप्रसन्न झाली भवानी । दिव्य दर्शनाते देऊनी । बाळशास्त्री तोषविला ।।९।। हेममुकुट शिरावरी । हिरकणी जडाव तयावरी । मौक्तिकहार कंठाभितरी । केश कुरळे शोभती ।।१०।। कुंकुम भाळी विस्तृत । हेममाळा ग्रीवी विलसत । सौगंधिक उटी देहाप्रत । वदनामाजी तांबूल ।।११।। चरणी रुणझुणती पैंजण । सुवर्णालंकार तळपे पूर्ण । अंगकांती रविसमान । प्रसृत होय तये ठाये ।।१२।। कटी शोभे जरतारी पीतवसन । अष्टायुधे अष्टकरी जाण । शोभे विद्युल्लतेसमान । मुख अंबुजासारिखे ।।१३।। ऐसी मनमोहिनी देवी ।

निजभक्ता स्वभजनी लावी । दर्शन बाळशास्त्री सद्भावी । देउनी काय वदतसे ।।१४।। हे जिवलगा सुभक्ता । श्रीसखाराम जो ज्ञाता । न जाणसी तया विरक्ता । अंद्यापिही बुधा तू ।।१५।। त्रिजन्मींचा जो योगी पूर्ण । त्वद्भाग्योत्कर्ष म्हणून । श्रीसखारामचरण । सदनी येत तुझ्या पैं ।।१६।। नामा तुका महीवरी । कीर्ती तेजे भास्करापरी । जैसे राहिले तैसे करी । श्रीसखाराम जाण तू ।।१७।। ऐसे वेदोनि भवानी । गुप्त झाली तत्क्षणी । मग बाळशास्त्र्यांची झणी । स्थिती कैसी जाहली ।।१८।। सात्विक अष्टभाव [1] उदेले । शरीर रोमांचित जाहले । ऐसे सर्वही भाव बाणले । बाळशास्त्रीया प्रति ।।१९।। मग सखाराम पाचारुन । वंदिले तयाचे चरण । धन्य राया तूं सगुण । सखारामा भक्तवरा ।।२०।। ऐसे गुरुकृत्य देखूनी । सखाराम विस्मित मनी । म्हणे सद्गुरुनाथालागुनी । विपरीत कैसे होईल ।।२१।। तद्वचनाते परिसुनी । शास्त्री करी भाषणालागुणी । मम भाग्य थोर म्हणोनी । लाभ मजसी झाला हा ।।२२।। ऐसे भार्येने विलोकुनी । प्रश्न केला कर जोडुनी । शिष्य आणि बाळ असूनी । कैसे तया वंदिले ।।२३।। श्रवण करोनी स्त्रीभाषण । येरु वदे हास्यमुख करुन । त्रिजन्मीचा योगी पूर्ण । सखाराम जाण हा ।।२४।। असो तया बाळशास्त्र्यांनी । विवेक केला स्वमनी । की आता सखारामालागुनी । श्रीमद्भागवत निवेदावे [2] ।।२५।। त्यातील मुख्य ज्ञानांश । जो वर्णिला स्कंधी एकादश । तोच सांगे सखारामास । उपयुक्त तया म्हणोनी ।।२६।। जैसे उत्तम भूमी देखून । करितो कर्षक[3] बीजारोपण । तैसेच सखारामा योग्य देखून । बाळाजी पेरी ज्ञानबीज ।।२७।। म्हणती ह्या भूमीत खचित । ज्ञानतरु वाढेल त्वरित । फलभाराने हा डोलत । राहील आनंदे कौतुकांच्या ।।२८।।





---

१ आनंद, आश्चर्य, भिती, रोमांच, शब्द बदलणे । २ सांगावे । ३ शेतकरी

ऐसा विवेक करुन । पाचारी सर्व शिष्यां जाण । म्हणती परिसा चित्त देऊन । एकादश स्कंध निवेदितों ॥२९॥ प्रथमाध्यायाचे ठिकाणी । परिक्षिती नृपा शुक्राचार्यमुनी । वदले ब्रह्मशापाची[1] करणी । कैसी यादवा जाहली ॥३०॥ ती सर्व केली कथन । निवेदिले मुसलजनन[2] । जै[3] यादवकुलसंहारण[4] । करुन भूभार नाशिला ॥३१॥ मग आरंभिले निरुपण द्वितीयाध्यायीचे संपूर्ण । शिष्यासी म्हणे केला प्रश्न । नारदा वसुदेव परिसावा ॥३२॥ वसुदेव म्हणे नारदाप्रती । तुम्ही श्रेष्ठ संत ह्या जगती । कवण ज्ञान दे सायुज्यमुक्ती । मजला कथी गुरुवर्या ॥३३॥ ऐसे तयाचे भाषण । नारदऋषी परिसून । म्हणे नवयोगीश्वरांनी ज्ञान । निमिराजासी कथियेले ॥३४॥ ते परम पुण्यपावन । भागवतधर्मांचे गुह्य जाण । सायुज्यमुक्तींते देत तूर्ण । श्रवण करी मनोभावे ॥३५॥ नवयोग्यांतील
अ कवी जाण । करी निमिराजाप्रति भाषण । म्हणे नरदेहाचे कर्तव्य पूर्ण । सेवावे चरण अच्युताचे 
४ ॥३६॥ हस्तपादादिक कर्मेंद्रिये । नेत्रकर्णादिक ज्ञानेंद्रियें । तयांच्या संबंधे जी जी कृत्ये । ती ती अर्पावी ईश्वरा ॥३७॥ सर्व कार्ये करिता ईश्वर । तयाचे फल भोगिता साचार । अद्वैतभावना दृढ थोर । मनी सर्वदा वसावी ॥३८॥ जीव परमात्मरुपापासून । वाटे जया केवळ भिन्न । ममत्व जडले अंगी पूर्ण । मायाजळी पडे तो ॥३९॥ माया ही ईशस्मृति । होऊ न दे कदा निश्चिती । म्हणून निमिराजा त्वरित गती । शरण जावे सद्गुरुसी ॥४०॥ सर्व वस्तूंचे ठिकाणी । भगवद्रुप सत्य मानी । भिन्न भासते मनुजालागुनी । परि सर्व स्वप्नवत् ॥४१॥ असो ऐसे अपरोक्ष[5] ज्ञान । नवयोगी कथिती नृपालागुन ।

---

१ ब्राम्हणाच्या शापाची । २ मुसळाची उत्पत्ती । ३ ज्याने-मुसळाने । ४ नाश,संहार । ५ प्रत्यक्ष

पंचमाध्यायापर्यंत जाण । वसुदेव होय पूर्ण ज्ञानी ।।४२।। ब्रह्मसुता[1] म्हणे तत्क्षणी । आता पुत्रमोह नये मनी । तो परमात्मा चक्रपाणी । कळोनी मजसी आले हो ।।४३।। बाळाजी सखारामा विलोकित । तंव तो हर्षभरे डोलत । म्हणे पुढती कैसे असे सद्‌गुरुनाथ । प्रेमयुक्त ते निवेदावे ।।४४।। उद्धवप्रश्ना परिसुनी । वदती तया चक्रपाणी । अमूल्य ही नरयोनी [2] लाधली अति सायासे ।।४५।। मानवदह क्षणभंगुर । करावा ईशप्राप्तीचा विचार । मुमुक्षु [3] साधकांनी साचार । मी कर्म कर्ता न मानावे ।।४६।। सत्त्व गुणाते वाढवोनी । रज-तमांते लया नेउनी । निष्काम भक्ती आचरोनी । चित्तशुद्धी करावी ।।४७।। आता प्राणायामाचे लक्षण । उद्धवा करितो निवेदन । त्याचे प्रकार असे दोन । सगर्भ[4] आणि अगर्भ[5] ।।४८।। सगर्भ प्राणायामाची महती । श्रेष्ठ होय या जगती । तयाची असे कैसी रीती । हृदयी धरी उद्धवा ।।४९।। मूलाधारचक्रापासून[6] उदरी । ब्रह्मरंध्रापासून [7] शिरी । कमलनालवत [8] निर्धारी । मार्ग असे वायूचा ।।५०।। ओम्‌कारजनक वायूप्रत । आकर्षावे ब्रह्मरंध्रापर्यंत । मग तो अवशिष्ट ॐकारात । स्वर आणूनी सोडावा ।।५१।। ऐसे त्रिकाळी प्रतिदिनी । करुनी आठवी मम रुप मनी । तेणें चित्त एकाग्र होऊनी । मम ज्योतीत लीन होय ।।५२।। ऐसे जे कोणी पुरुष । करुनी जिंकितील इंद्रियांस । होती लीन ईशरुपी त्यांस । प्रसन्न होय सिद्धित्रय ।।५३।। प्रथम ती स्वाभाविक । जियेचे अष्ट भेद देख । अणिमा, महिमा, लघीमा, प्राप्ति नामक । प्राकाश्य, ईशिता, वशिता,

---

१ नारदाला । २ मनुष्यजन्म । ३ मोक्षेच्छु । ४ मंत्र जपाने एकदोन मंत्र जपे पर्यंत प्राणायाम । ५ मात्रापूर्वक मात्रा संपेपर्यंत प्राणायाम । ६ प्रथम चक्रापासून । ७ तालूवरील चक्रापासून । ८ कमळाच्या देठाप्रमाणे

प्राकाम्या ।।५४।। द्वितीय ती गौणक असती । जिचे दश प्रकार निश्चिती । अनुर्मिमत्व, दुरश्रवण, द्वितीय ती । दुरदर्शन, मनोजव कामरुप ।।५५।। परकायाप्रवेशन । सुरक्रीडा, स्वच्छंद जाण । संकल्प, संसिध्दी पुरातन । अप्रतिहत आज्ञा, दहावी ।।५६।। क्षुद्रा सिद्धीचे भेद पांच । त्रिकालज्ञत्व अद्वंद्वा साच । परिचित, प्रतिकार ह्याच । अपराजया पांचवी ।।५७।। सायुज्यमुक्तीसी विघ्न । करिती ह्या उद्धवा जाण । बुधांनी न व्हावे अधीन । प्रसन्न सिद्धी झालिया ।।५८।। विषयी मानवाची स्थिती । केवळ कीटकासम असती । स्त्रीदेही प्रीती अती । जो सर्वांमाजी अमंगल ।।५९।। इंद्रियतृप्तीकरण । योषितेठायी मन । जडे परि सत्यस्वरुपज्ञान विसरुनि जातो मानव ।।६०।। जैसे प्राणी मनोराज्यात । अथवा स्वप्नावस्थी भोगित । सुखादु:खात्मक अनुभव समस्त । तैसाचि प्रपंच जाणावा ।।६१।। स्वप्नांतील सर्व विकार । निद्रा त्यागिता जाती सत्वर । तैसे अज्ञानमुक्त होता साचार । प्रपंच बाधा न होय ।।६२।। अज्ञान विषयासक्तीचे कारण । हयाचा जो रिपू वैराग्य पूर्ण । त्याचे करुनी अवलंबन । स्वरुपज्ञाना संपादी ।।६३।। उद्धवा न हो इंद्रियांधीन । विषयोपभोगा तुच्छ मान । सत्यमय भासे प्रपंच जाण । परी अलिप्त असावे ।।६४।। जो का मुमुक्षु पुरुष । अपमान विडंबना केला द्वेष । तरी शांती न सोडावी नि:शेष । कालत्रयीं तयाने ।।६५।। शम [1] दम [2] आणि तितीक्षा[3] । तपश्चर्या सत्य दया ईक्षा[4] । स्मृती संतोष निरपेक्षा । श्रद्धा न सर्वदा सोडावी ।।६६।। क्रिया उन्माद[5] अभिलाष । गर्व सस्पृहता[6] असंतोष । कदा न व्हावा यांचा स्पर्श । साधक मनुजा

---

१ ज्ञानेंद्रियाचा निरोध ।२ कर्मेन्द्रियाच्या आकलन निरोध जप । ३ सहनशीलता । ४ विचार । ५ ताठा । ६ लोभ

ऊद्धवा ॥६७॥ काम, क्रोध, अनृत भाषण । लोभ, परपीडा, याचना जाण । आळस, आशा, निरुद्योग पूर्ण । सहसाही नसावा ॥६८॥ इतुकें करुनी निरुपण । बाळशास्त्री वदे शिष्यांलागुन । आतां हंसगीत करा श्रवण । मुख्य सार जे भागवताचे ॥६९॥ पूर्वी सत्यलोकी सनकादी । संशयग्रस्त झाले तत्त्वसंबंधी । निःसंदेहार्थ[1] पृच्छा करिती आधी । जगत्कर्त्या स्वपित्यासी ॥७०॥ समाधान न होय पित्याकडून । तव प्रार्थिते झाले प्रभूचरण । मग मनोजवें येई दयाघन । हंसरुपे तये ठायी ॥७१॥ तुम्ही कोण हा त्यांनी केला प्रश्न । तैं वदे जें हंस सगुण ।श्रोते द्यावे अवधान । तया कथाभागासी ॥७२॥ पारमार्थिक वा स्थूलमानें । हा प्रश्न अयोग्य जाणे । सर्वांठायी परमात्मा व्याप्तपणे । ह्या व्यतिरिक्त नसें काही ॥७३॥ जैं चित्त आणि विषय एकत्र होई । तैंच उपाधी जडे देही । ती आरोपीत आत्म्यावरीं पाही । भासमान अस्तित्व अनुभवा ये ॥७४॥ त्या उपाधीचा लय । करावा तुर्येनें विवेकियें । जी अवस्था साक्षीभूत आनंदमय । संधीमाजी[2] वसें ती ॥७५॥ ह्या क्रमे चित्त चैतन्यता । क्रमें क्रमें उचित वाढविता । मग जडाभास[3] नष्ट होय तत्त्वता । सद्गुरुकृपेकरुनी ॥७६॥ ज्या योगे धृव प्रल्हाद तरले । वसिष्ठें श्रीरामा उपदेशिले । सांदीपनें जें श्रीकृष्णा कथिले । तें हें 'तत्त्वमसि' महावाक्य ॥७७॥ उपनिषदी हेच प्रतिपादिले । नवनाथीही हेच तत्व कथिले । जेणे याज्ञवल्क्याही ब्रह्मनिष्ठ झाले । ते हे 'तत्त्वमसि' महावाक्य ॥७८॥ ज्यापुढें त्रिभुवनही थोकडे । सर्व मंत्रतंत्र बापुडे कैवल्यपददायी[4] रोकडे । तें हें 'तत्त्वमसि' महावाक्य ॥७९॥ ज्याचा महिमा वाणीस न वर्णवे । ज्ञानही विज्ञानी लयो पावे । सारभूत कथिलें मनोभावे । ते हें 'तत्त्वमसि' महावाक्य ॥८०॥

---

१ निःसंशयार्थ । २ वृत्ती जेंव्हा नसते अशा काळात । ३ जड पदार्थावरील 'मी व माझे' असा भ्रम । ४ मोक्षपद देणारे

त्रिपादशोधने होय पुढती । सर्व सिद्धी पुढे उभ्या तिष्ठती । ब्रह्मानंदी निमग्न राहती । तत्त्वमसीमाजी जे अनुरक्त ॥८१॥ सच्चिदानंद पदत्रय । तेंचि अस्ति भाति प्रिय । ॐतत्सदिती[१] निर्देशनीय । वर्णिले भगवद्गीतेत ॥८२॥ ऐसे हे परम गुह्य । तुम्हांला निवेदिले अनाद्य । मायोपधि उच्छेद्य । निःसंदेह जाण बा ॥८३॥ हे ज्ञानामृत करी जो सेवन । सायुज्यमुक्ती मिळे संदेहही न । परी तयाच्या समागमें जाण । मोक्ष मिळे लवलाही ॥८४॥ असो उद्धव हरिआज्ञा घेऊनी । बद्रीकाश्रमी गेला तत्क्षणी । पुढती कृष्णनिर्याणा[२] कथुनी । संपवी स्कंध बाळाजी ॥८५॥ एकादशस्कंधाचे ज्ञान । सखारामे परिसून । गुरुस वदे कर जोडून । योगाभ्यासा शिकावा ॥८६॥ मग बाळशास्त्री गुरुंनी । शिकविले योगाभ्यासालागुनी । म्हणे मम श्रमा सफल करुनी । द्यावे शिष्यचतुरा ॥८७॥ जे हा अध्याय ऐकती । तयांच्या चित्ता होय शांती । अथवा जे भक्त पठण करिती । अघगिरी[३] होय दग्ध त्यांचा ॥८८॥ असो सखारामे पंचवर्षात । विद्याभ्यास संपविला तेथ । मग बालकासी घेऊनी येत । बाळकृष्ण स्वग्रामा ॥८९॥ पुढील अध्यायी होय लग्न । सखारामाचे जाण । ऐकता आनंदित मन । श्रोतियांचे होईल ॥९०॥ स्वस्ति श्रीसखाराम लीलामृत । कर्ता करविता गिरिजाकांत । रघुपतीसी करुनी निमित्त । चतुर्थोध्याय संपविला ॥९१॥ श्रीसखारामचरणार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

॥ चतुर्थोध्याय समाप्त ॥

---

१ ‘तत्’ पद, ‘त्वं’ पद, ‘असि’ पद यांच्या ज्ञानाने । २.भगवंताच्या वैकुंठगमनाला । ३ पापाचा डोंगर

# अध्याय ५ वा



सखारामाचा लग्न समारंभ



विरक्त सखाराम



।। श्री गणेशाय नमः ।। जय जयाजी महेश्वरा । त्रिशुळपाणी गिरजावरा । प्रज्ञा देई या किंकरा । रचावया काव्याते ।।१।। मागील अध्यायी कथन केले । सखारामे ज्ञान संपादिले । बाळकृष्ण घेउनी आले । तया तळणी ग्रामासी ।।२।। विलोकुनी निजनंदन । हर्षित झाली अहल्या जाण । प्रेमें तया ह्रदयी धरुन । काय भाषण बोलली ।।३।। बाळा तूंते अवलोकुनी । आजि तृप्तता आली नयनी । अन्य ग्रामी तुज जाऊनी । बहुत वत्सर जाहले ।।४।। आता झालासी विद्यावंत । पुराण सांगे देवालयांत । मान्य होशील सर्व जनांत । धनही तुजला मिळेल ।।५।। ऐशापरी जननी । बोधी सखारामालागुनी । बाळकृष्णही निशिदिनी । हेचि वदे तयाला ।।६।। असो वायकर उपनांवाचा । गृहस्थ पाराशर गोत्रीचा । ‘अप्पा’ नामे कुलीन घराण्याचा । वास्तव्य ज्याचे तळणीत ।।७।। तयासी कन्या एक । असे शांत सात्विक । तिचे स्वरुप अति मोहक । वाटे पद्मीण दुसरी ।।८।। जैसे देखता रोहिणीपती । आल्हाद वाटे बहुत चित्ती । तैसे देखता मुखेंदूप्रती । मनासी आनंद होतसे ।।९।। हरिणाक्षी बिंबाधरी [1] । पक्वडाळिंब बीजापरी । दशन[2] शोभती पीकस्वरी । सरळ सुंदर नासिक ।।१०।। सिंहकटी मंजुभाषिणी[3] । स्मित हास्य करितांक्षणी । गुलाब सुमनाऐसें झणी । गाल तियेचे शोभती ।।११।। ऐसी लावण्यखाणी । दशवर्षाची कुमारीणी । तिचा विवाह करावा म्हणूनी । पिता वर शोधितसे ।।१२।। बहुत स्थळे शोधिली । तरी न

१ तोंडलाच्या फळाप्रमाणे जिचे ओठ आहेत अशी । २ दांत । ३ कोकीळ कंठी

योग्य वाटली । मग सखाराममूर्ती ठसली । चित्ती बहु अप्पांच्या ।।१३।। स्वरुपी जैसा मदन । विद्यायुक्त गुण संपन्न । हाचि योग्य कन्येलागून । पती मजला दिसतसे ।।१४।। ऐसा विवेक करुनी । गेला बाळकृष्णाचे सदनी । मम कन्या लावण्यखाणी । स्नुषा म्हणूनी अंगिकारावी ।।१५।। घटीत गोत्राते देखुनी । तिथी ठरविली बाळकृष्णांनी । म्हणे आता जावे सदनी । सिद्धता वेगें करावी ।।१६।। हें सखारामे परिसूनि । बोले स्वपित्यालागुनी । मी आपुले लग्न करुनी । सहसा बद्ध न होई ।।१७।। नको हा संसार मजला । ह्याचा वीट वाटे मनाला । न सुटे भवसागर कुणाला । प्रपंची होता आसक्त ।।१८।। याकरिता तयापासून । आधीच अलिप्त असावे जाण । हेचि मजला वाटे पूर्ण । ह्यांतचि नरदेह कृतार्थ ।।१९।। ऐसे भाषण परिसुनी । बाळकृष्ण वदे चकित होऊनी । परमार्थ प्रपंच साधुनी । न करवे का वेडिया ।।२०।। पूर्वी जे जे झाले संत । त्यांनी न त्यागिले प्रपंचाप्रत । संसार करुनी इष्ट दैवत । भक्तिबळे वश केले ।।२१।। राही बा प्रपंचाभितरी । अवश्य मग परमार्थ करी । कुलदीपक हो तूं तरी । स्ववंशी या बालका ।।२२।। नको नको हा प्रपंच । न लगे कीर्ती मजला साच । आवडे अरण्य मजला तेच । जेथे आनंद अखंड ।।२३।। ऐसें तयाचे वचन । बाळकृष्णे अमान्य करुन । शके सतराशें बाविसांत जाण । आनंदकार्य आरंभिले ।।२४।। मार्गशीर्ष मासी शुक्लपक्षी । गुरुवासरी पंचमी तिथीसी । उत्तराषाढा नक्षत्रासी । आनंदकार्य आरंभिले ।।२५।। वऱ्हाडी सर्व जमविले । मंडपी तुरे लाविले । अप्पांनी ब्राम्हण जमविले । देवप्रतिष्ठा मांडिली ।।२६।। लावण्यसुंदर ती अती । हरिद्रा लावूनी तिजप्रती । कामिनी त्वरे घेऊनी येती । शेष हरिद्रा सखारामा ।।२७।। सखाराम, अहल्या,

अ ५

बाळकृष्ण । बैसले चौरंगी येऊनी । न्हाऊ घालिती नितंबिनी सगुण । मंगल वाद्ये वाजती ।।२८।। असो ते यथाविधी होता जाण । लग्न घटिका सन्निध देखून । वायकर वऱ्हाडी संपूर्ण । पाठवी मूळ वरासी ।।२९।। दया, क्षमा आणि शांती । सद्विद्या, सद्‌गती, उपरती । श्रुती, स्मृति चारी मुक्ती । येताती ऐशा वऱ्हाडिणी ।।३०।। ज्ञान, वैराग्य, सद्विवेक । आनंद, बोध, परमार्थ देख । इतुके वऱ्हाडी आले चोख । बाळकृष्णगृही प्रेमभरे ।।३१।। सखारामा तयांनी । तुरंगावरी[1] बैसवोनी । पुढे वाद्यगजर करवोनी । आणिले मिरवित अप्पागृही ।।३२।। त्यांनी सखारामचरण । यथाविधी प्रक्षाळून । मधुपर्क पूजादी करुन । यज्ञोपवीत दिधले ।।३३।। लग्नघटिका अवलोकून । वधूवरांमध्यें अन्त:पट धरुन । द्विज मंगलाष्टकें म्हणून । सावधान बोलती ।।३४।। सावधान शब्द परिसुनी । सखाराम करी विवेक मनी । की सुंदर ललना ब्रम्हदेवानी । निर्माण केल्या कशास्तव ।।३५।। मानवदेह आहे विचारी । पुण्यवृक्ष लावुनी झडकरी । होईल मोक्षाचा अधिकारी । काही नसता धैर्यबळ ।।३६।। ऐसा विवेक करुनी । निर्माण केल्या कामिनी । की ज्ञानवल्ली छेदण्यालागुनी । निर्मिल्या ऐसे वाटते ।।३७।। स्त्रीमोह अती कठीण । कोणा न सुटे करिती प्रयत्न । हाचि जन्म-मरणाचे कारण । शास्त्रेपुराणे बोलती ।।३८।। सुंदर कामिनीचे ठायी मन । लागून राहता पूर्ण जाण । मग विवेक जाय लोपून । म्हणून स्त्री मूळ अनर्थाचे ।।३९।। कोणी होता स्त्रीचे अधीन । तयाचे आयुः कीर्ति संपूर्ण । विलयासी जाती तूर्ण । होता केवळ नरपशु ।।४०।। जन्म घेतले अनंत । एकाही जन्मी संसारात । सौख्य न मिळाले किंचित् । वासना त्यात राहतसे ।।४१।। वासनेच्या कारणांनी । जन्म घ्यावा लागतो जनी ।



[1] घोड्यावरी

म्हणोनी आता माझे मनी । प्रपंच नकोसे वाटते ।।४२।। बहुत वदलो पिताजननीसी । की लग्न करुनी बद्ध मजसी । करूं नका परी वचनासी । माझ्या न त्यांनी मानिले ।।४३।। आता अधिकारी दोषाचा । मी किमपि नसेची साचा । सावध वदली द्विजवाचा । मी नच सदनी राहेची ।।४४।। लग्नसमयी रामदासांनी । सावधानता सत्य करुनी । दाविली तैसीच सखारामांनी । पुढती दाविली श्रोतेहो ।।४५।। असो मंगलाष्टके संपली । विप्रे टाळी वाजविली । वाद्ये अनेक वाजो लागली । नाही पार आनंदासी ।।४६।। बाळकृष्ण अप्पादेवांनी । दक्षिणा विप्रांते देवोनी । पूगीफलादी करोनी । संतुष्ट केले सर्वांते ।।४७।। लाजाहोम सप्तपदी करी । गौरीहरा पूजी झडकरी । मग येवोनी बहुल्यावरी

अ ५ । सखाराम बैसले ।।४८।। थट्टा मेहुण्या आरंभिती । सुपारी खेळा ऐसें म्हणती । नेत्रसंकेत एकमेका ३०

५ करिती । सोहळा ऐसा होतसे ।।४९।। सासू जामाता देखून । केवळ म्हणे पंचबाण । कन्येचे भाग्य थोर म्हणून । ऐसे रत्न लाभले ।।५०।। असो अप्पादेवांनी । पक्वान्नभोजन देवोनी । संतुष्ट सर्व विप्रा करुनी । आशीर्वाद घेतला ।।५१ ।। द्वितीय दिनी अहल्या जाण । सुनमुख देखण्या उद्युक्त होऊन । अत्त्यानंदित करुनी मन । म्हणे कृतार्थ झाले मी ।।५२।। तृतीय दिनी बाळकृष्ण । अर्पी द्विजांते मिष्ठान्न । चतुर्थ दिन येता जाण । साडे तयांनी संपविले ।।५३।। तये वेळी केले लक्ष्मीपूजन । स्नुषेचे नाम सरस्वती ठेऊन । वधूवरा गुरुजनांते वंदून । शर्करा यथेच्छ वाटली ।।५४।। ऐसा सोहळा संपवून । लग्नोत्सवाचा आनंद मानून । स्वगृही गेले सर्व जण । प्रेमानंदे डुलत ।।५५।। असो लग्न केले म्हणोनी । सखारामा अयोग्य वाटोनी । वाशीम ग्रामी जाऊनी । वंदन करी गुरुते ।।५६।।

गुरुआज्ञेस त्वरीत। घेवोनी शोधिले पद्मतीर्थ। जे तेथे असे विख्यात। सर्वपापविमोचक ।।५७।।
सखारामांनी तेथ। कित्येक दिनपर्यंत। तपश्चर्या केली निश्चित। पुढती आले 'रिसवडा' ।।५८।।
तया ग्रामी एक सरोवर विस्तीर्ण। तये तटाकी असे दिव्य स्थान। 'श्रीपिंगलाक्षी' नामेकरून। जेथे
सखारामें वास केला ।।५९।। असो तयाची वृत्ती विदेही। जाहली असे करी ह्रदयी। श्रीगणपतीचे
ध्यान पाही। तुच्छ केले ऐहिक सुखा ।।६०।। वैराग्य म्हणावे याप्रती। की तुल्य जया निंदास्तुती।
शितोष्णही समान असती। मानापमान सारिखा ।।६१।। याचेंच नांव अनुताप। ऐसे वैराग्य त्यासी
अमुप। शांती मिळे मन निष्पाप। होवोनी राहे सदैव ।।६२।। असो यापरी वैराग्ययुक्त। सखाराम
अहल्यासुत। साधायाते आत्महित। अरण्यांत राहतसे ।।६३।। गृही कां न ये स्वकुमर। म्हणूनी
असती चिंतातूर। मातापिता निरंतर। प्रपंची तया वळविण्या ।।६४।। सखारामाच्या शोकेकरुन
उद्विग्न होऊनी बाळकृष्ण। अयोध्याधीश दशरथासमान। देह ठेविला तयाने ।।६५।। पतीचेही दु:ख
जाहले। स्वतनयविरहे उदासले। तया अहल्येचे मन बुडाले। दु:खार्णवामाजी पैं ।।६६।। अवलोकूनी
स्नुषेसी। अहल्या दु:खित मानसी। गोड न लागे अन्न तिजसी। कृशतनु जाहली पैं ।।६७।। असो जन
वर्तमान कथिती। की सखाराम तुझा निश्चिती। रिसोड वनी ईशचिंतनाप्रती। करितो फळें भक्षुनी
।।६८।। ऐसी माता कळता तिजसी। निघे माता ती तया वनासी। शोधित चालली स्वपुत्रासी। मोह
अनावर नावरे ।।६९।। जये ठायी सखाराम होता। तये स्थली आली माता। तव तिच्या दृष्टीस पडता
। जाहला असे बालक ।।७०।। स्वपुत्र देखतां नयनी। अहल्या वदे आक्रोशोनी। सखारामा तूं गृह
त्यागोनी। कां रे येथे बैसलासी ।।७१।। करिता मी तव शोधास। मजला झाला अति त्रास। तरी

येऊनी सदनास । प्रपंच सुखे करावा ।।७२।। मातृवचन यापरी । सखाराम ऐकुन झडकरी । तेथुनी पलायनाते करी । स्वमातेसी देखता ।।७३।। निजानंदी ते रंगले । ईश्वरध्यान चित्ती चालले । भान कांहीच न राहिले । नग्न झाले तरीही ।।७४।। तैसेचि पळाले नग्न । वाशीमग्रामी आले जाण । गुरुगृही येवोनी चरण । सद्गुरुचे वंदिले ।।७५।। गुरुने देखिले वस्त्ररहित । एक वसन दिले तयाप्रत । ते कटी वेष्टूनी त्वरित । वनी जावया निघाले ।।७६।। गुरु वदती तयासी । त्यागूनिया गृहासी । सखारामा तूं कोठे जासी । पिशाच्चवृत्ती धरुनी ।।७७।। राहुनिया संसारात । ईशप्राप्ती सुलभ अत्यंत । ऐशापरी उपदेश बहुत । करी परी व्यर्थ असे ।।७८।। सखारामा तद्दिनी । बाळशास्त्री घेत ठेवोनी । तव दृष्टांत देवीकडुनी । झाला तयाच्या गुरुसी ।।७९।। की सखाराम होय महासंत । बद्ध न करी संसारांत । प्रपंची असोनी परमार्थ । करणे प्रथम पायरी ।।८०।। आधी करिता सगुणभक्ति । मग निर्गुणी जडे प्रीति । तैसीच सखारामाची निश्चिती । प्रथम भक्ती संपली ।।८१।। आतां सखाराम साचार । विश्वकुटुंबी होई सत्वर । हे ऐकता बाळशास्त्री शीर । चरणी ठेवी तियेच्या ।।८२।। सूर्योदयी द्वितीय दिनी । सखाराम गुर्वाज्ञा घेऊन । जाते झाले काननी । गणेशचिंतन करीत ।।८३।। पुढील अध्यायी गमन । सखाराम काशीसी करुन । करवील जान्हवी दर्शन । स्वमातेसी श्रोतेहो ।।८४।। स्वस्ति श्री सखारामलीलामृत । कर्ता करविता गिरीजाकांत । रघुपतीसी करुनी निमित्त । पंचमोध्याय संपविला ।।८५।। श्री सखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।। ।।पंचमोध्याय समाप्त ।।

अध्याय ६ वा



सखाराम महाराज भागीरथीत तप करित आहेत. आईला भागीरथी दर्शन



।।श्री गणेशाय नमः।। हे अपर्णावरा दीनानाथा । पदी ठेवूनी दास माथा । विनवितसे कृपावंता । रसाळ काव्य वदवावे ।।१।। मागील अध्यायी निरुपण । झाले सखारामाचे लग्न । पुढती गुरुगृही येऊन । अरण्यात हिंडतसे ।।२।। तैसेचि फिरत फिरत । लोणारग्रामी अहिल्यासुत । येऊनिया राहिला तेथ । कमलजा देवीसंन्निध ।।३।। तेथे एक विस्तार्ण । सरोवर असे जाण । तये ठायी एक देवस्थान । भागीरथीनीर येतसे ।।४।। ऐसी ख्याती असे बहुत । सोमवतीस यात्रा जमत । काशीसम पवित्र अत्यंत । तेथे सखाराम तप करी ।।५।। क्रमोनिया कित्येक दिन । काशीक्षेत्री केले गमन । तेथे 'माणिकशास्त्री' म्हणून । बंधू होता अहल्येचा ।।६।। तो वेदशास्त्रांमाजी निपूण । शिवउपासक असे पूर्ण । तयांनी सखारामा देखतां जाण । पाचारिले स्वगृही ।।७।। आगमनाचा हेतू संपूर्ण । माणिकशास्त्री घेत समजून । मग म्हणती तपश्चर्येस स्थान । योग्य घाट मनकर्णिका ।।८।। तेथील महात्म्य केले वर्णन । काशीखंडात संपूर्ण । की विश्वनाथ नित्य करी स्नान । जेथें दत्तस्थान असे ।।९।। ऐसा तो घाट पुण्यपावन । तेथे जाऊन अहल्यानंदन जलस्तंभ योग साधून । तपश्चर्या मांडिली ।।१०।। धन्य धन्य ती भागीरथी । समूळ नाशी पातकांप्रती । स्वर्गी जैसी अमरावती । मृत्युलोकी त्यापरी ।।११।। जिच्यामध्ये करिता वस्ती । मानव पावती सायुज्यमुक्ति । जेथे प्रत्यक्ष सांबमूर्ती । गिरिजेसहित वसतसे ।।१२।। काळभैरव अन्नपुर्णा देख । वसती सर्व देव आणिक । जिला स्मरता घोर पातक । दग्ध होई तत्क्षणी ।।१३।। ऐशा पुण्यक्षेत्राचे ठायी । सखाराम योगी जाई । जान्हवीचे उदकी पाही । समाधी लावुनी बैसले ।।१४।। इकडे अहल्या जननी । तनय गृहा न ये म्हणूनी । दुःख करी निशिदिनी । गोड न लागे अन्न

तिज ॥१५॥ ऐशी  असता चिंताक्रांत । सरस्वती झाली ऋतुस्नात । हे घडता अहल्येप्रत । अपार
दुःख जाहले ॥१६॥ म्हणे किती सखारामाला । शोधू नसे या समयाला । व्यर्थ मजसी त्रास झाला
। याचे लग्न करुनी ॥१७॥ ऐशा या संकटात । तूंचि संरक्षी गणनाथ । गृहा यावा माझा सुत ।
मंगलमुर्ती विघ्नेशा ॥१८॥ गणपती-स्तवन ऐशा परी । अहल्यासती प्रेमें करी । इतुक्यामाजी
सत्वरी । पत्रिका धाडिली माणिकें ॥१९॥ की सखाराम तुझा सुत । जान्हवीमाजी तप करीत । तुवां
असावे गृही शांत । तेथे येईल तप संपता ॥२०॥ ऐशी वार्ता केली श्रवण । धैर्य न धरी किमपी मन
। पुत्रमोह असे अति कठिण । धरिला पथ काशीचा ॥२१॥ अत्यंत मार्ग तो कठीण । तरुवरा गिरीते
देखून । भयभीत होय तिचे मन । चाले तरी धीरतेने ॥२२॥ ऐशापरी तो घोर पथ । अहल्या चालली
अ क्रमित । प्रयागक्षेत्री आली त्वरीत । पुण्यपावन अत्यंत जे ॥२३॥ तेथे त्रिवेणीसंगम जाण । तया ३४
६ स्थलाचे वर्णन । न करवे शेषालागून । वर्णील कैसा हा अल्पमती ॥२४॥ त्रिवेणीचे स्नान करुनी ।
अहल्या निघाली तेथूनी । मार्ग क्रमित पवित्र स्थानी । आली काशीक्षेत्री ती ॥२५॥ विश्वेश्वरा
अभिवंदुनी । गेली स्वबंधूच्या सदनी । सर्व माहिती माणिकशास्त्र्यांनी । निवेदिली सखयाची ॥२६॥
की तुझा पुत्र योगीवर । जान्हवीजली साचार । योगसाधना करी थोर । केव्हा तटी येतसे ॥२७॥
तयाच्या वचना परिसुनी । अहल्या निघाली तेथूनी । देखण्या स्वपुत्रालागुनी । जान्हवीतटी पातली
॥२८॥ कांही वेळ होताक्षणी । योगसाधना संपवुनी । सखारामे उदकांतुनी । स्वजननी देखिली
॥२९॥ तेथोनीच प्रणिपात करी । स्वमातेसी तो झडकरी । नम्र वचनें वदे येथवरी । श्रम कां केले

जननी हे ॥३०॥ तद्भाषित करुनी श्रवण । अहल्या तया करी भाषण । ऐसे कैसे अप्रमाण । तप
करिसी बालका ॥३१॥ व्यर्थ तुझे तपाचरण । व्यर्थ तुझे योगसाधन । मात्राज्ञाभंगासमान । दुष्कृत
नसे दुसरे ॥३२॥ मातेसम अन्य दैवत । नाही बाळा त्रिभुवनांत । असुनी तूं ज्ञानवंत । मग मला कां
शिणवीसी ॥३३॥ तुजला बहुत जण निंदिती । त्याची लज्जा नसे चित्ती । ऐसा तूं मानशून्य निश्चिती
। व्यर्थ तुज मी प्रसवले ॥३४॥ स्वग्रामासी आतां तरी । चल बाळा तूं सत्वरी । सखया तव पत्नी
सुंदरी । ॠतुस्नात जाहली ॥३५॥ ऐसें जननीचे भाषण । सखारामे परिसून । करण्या माता समाधान
। तीन अंगुल्या दाविल्या ॥३६॥ याचा मतितार्थ हाच जाण । की होतांचि मास तीन । येईल मी
गृहालागुन । निश्चयत्वे जननीये ॥३७॥ तिने ह्याचा हेतू समजून । म्हणे अंगुलीप्रत दावून । करिसी
व्यर्थ समाधान । सखारामा माझे तूं ॥३८॥ आतां मी तुजवाचून गृही । कदापि न जाय पाही । जरी
न येसी तूं लवलाहीं । येथेचि प्राण देईन ॥३९॥ मातृवाणी ऐकूनी ऐशी । सखाराम चिंताक्रांत
मानसी । जरी आतां जावे सदनासी । तपोभंग होईल ॥४०॥ न जावे तरी माता कष्टी । सखाराम पडे
ऐशा संकटी । जाणोनी स्वरुप प्रगटी । सत्वरी ती जान्हवी ॥४१॥ पातकनाशिनी भागीरथी ।
लावण्यखाणी रुपवती । देखूनी विस्मित अहल्यासती । आपुल्या चित्ती जाहली ॥४२॥ म्हणे कोठून
अकस्मात । स्त्रीरत्न आले येथ । अमूल्य अलंकार विलसत । देहावरी जियेच्या ॥४३॥ असो जान्हवी
बोले तियेसी । की अहल्ये जाई सदनासी । सखाराम येईल त्रयमासी । निश्चयत्वें जाण तूं ॥४४॥ ऐसें
वदोनी तत्क्षणी । गुप्त होय जान्हवी झणी । गंगाज्ञेते ग्रहण करुनी । गेली अहल्या स्वग्रामा ॥४५॥

धन्य धन्य ती अहल्यासती । की पुत्रयोगे तिजप्रती । प्रत्यक्ष भेटली भागीरथी । सुपुत्र त्यासचि म्हणावे ।।४६।। सत्यवादी सदाचारी । सदा ईशभक्ती करी । काया झिजवी परोपकारी । सुपुत्र त्यासचि म्हणावे ।।४७।। ज्याच्या योगे वंश धन्य । जो कां सर्व लोकां मान्य । पितरांसम नसे दैवत अन्य । सुपुत्र त्यासचि म्हणावे ।।४८।। पितृसेवेमाजी दक्ष । सदा सत्कर्मी ज्याचें लक्ष । वाढवी सुज्ञानाचा वृक्ष । सुपुत्र त्यासचि म्हणावे ।।४९।। विद्या सर्व कलायुक्त । ज्यांचे वच नम्र वदनोक्त । तत्त्ववेत्ता आणि विरक्त । सुपुत्र त्यासचि म्हणावे ।।५०।। सुपुत्रलक्षणें संक्षिप्त । यथामती वर्णिली येथ । याच्या व्यतिरिक्त जे का सुत । ते कुपुत्र जाणावे ।।५१।। असो पुढे लोटता त्रयमास । सखाराम गेले निजगृहास । मातेने देखता तयास । अत्त्यानंदित जाहली ।।५२।। त्रेतायुगी रघुपती अरण्यांतुनी सदनाप्रती । येता जैसा मोद अती । कौसल्येते जाहला ।।५३।। तैशापरी अहल्येला । आनंद मानसी जाहला । श्री सखारामपत्नीला । मोद चित्तीं न समाये ।।५४।। सखारामाचे फलशोभन । वेगे करावे म्हणून । सर्व तिने आप्तजन । मेळविले त्या काळी ।।५५।। म्हणे या योगेकरुन । विषयलंपट होऊन । सखाराम स्ववर्तन । निःसंशय सोडील ।।५६।। मग उत्तम दिन देखूनी । सुद्विजाते पाचारुनी । गर्भाधान विधी तो झणी । त्यांचे हस्ते करविला ।।५७।। रात्री बळेच त्या लागून । शयनगृही लोटिले जाण । पुढें होऊनी सावधान । परिसा कथा सुधेसम ।।५८।। सखाराम जाताक्षणीं । पत्नी उभी अवलोकुनी । विवेक करिते झाले मनी । की हा विषय अनर्थ मूळ ।।५९।।(संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ।। क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः। स्मृतिभ्रंशांत बुद्धिनाशो।

बुद्धिनाशात्प्रणश्यति ।। भ.गी.२ ।६२,६३ ॠ ।।६०।। जरी ईशी करावा संग । तरी परमार्थी येईल
व्यंग । दुर्निवार हा अनंग । ब्रह्मादिका नाटोपे ।।६१।। विश्वामित्र गाधीसुत ।। श्रेष्ठ जो का तपस्व्यांत
। विलोकूनी मेनका त्वरित । तपापासून भ्रष्टला ।।६२।। महादेव त्रिशूळपाणी । भिल्लीणीचा हावभाव
देखुनी । रामस्मरणातें विसंबुनी । तिच्यामागें लागले ।।६३।। ऐसा करुनी सद्विवेक । तो सखारामसंत
देख । राजयोग समाधी अलौकिक । लाऊनी रंगे ब्रम्हानंदी ।।६४।। ऐसे पतीचे कृत्य देखुनी । ती
समागम व्हावा म्हणोनी । उपाय अनंत योजी मनी । परी सर्व निरर्थक ।।६५।। पूर्वी जैसे शुक्राचार्यासी
। मोहावया मृत्युलोकासी । इंद्रे पाठविले रंभेसी । सर्वाहूनी जी रुपवती ।।६६।। सिंहकटी गजगामिनी
अ । पद्मनयना मंजुभाषिणी । गौरवर्णा चारुस्तनी । पीकस्वरी मोहिनी ।।६७।। इंदूसम हास्यवदन । 
६ तयामाजी तांबूल जाण । ऐशी ती शुकालागुन । मोहावया पातली ।।६८।। तिने हावभाव केला बहूत
। परि तो थोर मुनी महा शांत । ज्याचे मन अति निश्चित । कालत्रयी न ढळेचि ।।६९।। तैसेचि
सखारामाने । मनासी निग्रहे इंद्रियदमने । निश्चलता आणिली पूर्णपणें । भेदबुद्धि निमाली ।।७०।।
इकडे ती चतुर पत्नी । ऐशापरी पतीस देखुनी । खिन्न झाली उपाय नेणी । तयासी वश करण्याचा
।।७१।। त्याने समाधी उतरुन । प्रभाती कज्जल वदना लावून । मग तो द्वारी येऊन । पलायनसंधी
देखतसे ।।७२।। सखारामाने कृष्णवदन । कां केले परिसा कारण । जे विषयासक्त असती जन ।
त्यांचे जगी मुख काळे ।।७३।। ऐसे झाले बहुतांचे । कमलोद्भव इंद्रादिकांचे । हे दावावया जनी
साचे । सखाराम ऐसे कृत्य करी ।।७४।। परी तया जन वदती । झाली याची पिशाच्चवृत्ती । कोणी

म्हणती भ्रम निश्चिती । झाला यासी डागावे ।।७५।। भूते झडपिले कोणी म्हणती । पाचारावें मांत्रिकाप्रती । ढोंग करी त्वरित गती । बांधा कोणी म्हणताती ।।७६।। जे कोणी खल दुर्जन । कुटाळ्या करिती दारुण । म्हणती अहल्ये तुझा नंदन । विजयध्वज निघाला ।।७७।। ऐसे वदती विविधजन । परी लोकापवादा त्यागून। जो अत्यंत असे कठीण । सखाराम निघे तेथुनी ।।७८।। जाते वेळी बोले जननी । सखया सांभाळी स्वपत्नी । ठेवूनिया आमुचे सदनी । सहसा जाऊं नको तूं ।।७९।। तो म्हणे येण्यास तिजप्रत । मुळीच नसे माझी हरकत । परंतु स्त्री दुर्दैवी अत्यंत । नच गेली त्यासंगे ।।८०।। असो सखाराम गृह त्यागुन । निघते झाले तेथून । मातेस मुक्ती देण्या आपण । काशीक्षेत्री त्वरितचि ।।८१।। भागिरथीजली जाऊनी । जलस्तंभ समाधी लावूनी । बैसले सखाराम मुनी । द्वादश वर्षेपर्यंत ।।८२।। पुढील अध्यायी कथानक । अहल्या पावेल स्वर्गलोक । सरस्वती करील अति शोक । येतील सखाराम लोणीस ।।८३।। स्वस्ति श्री सखारामलीलामृत । कर्ता करविता गिरिजाकांत । रघुपतीसी करुनी निमित्त । षष्ठाध्याय संपविला ।।८४।। श्री सखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।

।। षष्ठोध्याय समाप्त ।।

# अध्याय ७ वा



सखाराम महाराजांचे पत्नीस दर्शन



लोक दर्शनास येऊ लागले